## यूपीआय शुल्काची अंमलबजावणी दिवाळीनंतर!



**नवी दिल्ली :** यूपीआय व्यवहारांवरील प्रस्तावित मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर)च्या अंमलबजावणीला तूर्तास मुदतवाढ देण्यात आली आहे. हे शुल्क १५ ऑक्टोबरपासून लागू होणार होते, मात्र सणासुदीचा काळ लक्षात घेऊन नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय)ने हा निर्णय दिवाळीनंतर लागू करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे व्यापारीवर्गाला तूर्त दिलासा मिळाला आहे. नवीन तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाणार आहे. सणासुदीचा काळ लक्षात घेऊन निर्णयाची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली आहे. शिवाय यापूर्वी केंद्र सरकारने दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय पेमेंटवर व्यापाऱ्यांना ०.४ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता. आता निवडक व्यापारी यूपीआय व्यवहारांवरच शुल्क लागू होणार आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८७

www.ramprahar.com

◆ बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


पनवेल मनपा मुख्यालयात विकासकामांबाबत चर्चा/३

रायगड जिल्ह्यातील भाताचे उत्पादन घटणार/५

व्हॉलीबॉल स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलचे वर्चस्व/८


# कचऱ्यापासून होणार कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मिती

## प्रकल्पांसाठी टास्क फोर्स स्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शहरांना कचरामुक्त करण्यासोबतच कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मितीला चालना देण्यासाठी प्रकल्प उभारणीसंदर्भात टास्क फोर्स स्थापन करण्यात यावेत. ज्या ठिकाणी शक्य आहे, तेथे राज्याच्या सीबीजी धोरणानुसार प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी कचरामुक्त शहरे आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पांबाबत आयोजित बैठकीत प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेतला. या बैठकीला राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज आदी यावेळी उपस्थित होते. केवा ग्रीनच्या कार्यकारी संचालक वृंदा ठाकूर, व्यवस्थापकीय संचालक केदार वझे, संचालक नंदन वझे यांनी केवा ग्रीनच्या वतीने नागपूरमध्ये राबविण्यात आलेल्या कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्पाचे सादरीकरण केले व राज्यात अशा प्रकारे प्रकल्प उभारण्यासंदर्भात माहिती दिली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कचऱ्याचे प्रमाण, उपलब्ध जागा, तंत्रज्ञानाची उपयुक्तता आणि गॅस पाइपलाइनचे अंतर या बाबी विचारात घेऊन प्रकल्पांचे नियोजन करण्याची गरज असून या क्षेत्रातील कंपन्या, तेल कंपन्या आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सहभागातून अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित करावी. या प्रकल्पांमुळे कचरा उचलण्यासाठी महापालिकांना करावा लागणारा खर्च वाचणार असून कचरामुक्त शहरांच्या उद्दिष्टाला चालना मिळेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# खालापुरात लॉजिस्टिक्स वेअरहाऊसची शेड कोसळली

## एक कामगार ठार, १५ जण जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील माणकिवली येथे कस्तुरी लॉजिस्टिक्स वेअरहाऊसचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी मंगळवारी (दि.१३) सकाळी १०च्या सुमारास लोखंडी शेड कोसळली. या दुर्घटनेत एका कामगाराचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहेत.

कस्तुरी लॉजिस्टिक्स वेअरहाऊस येथे लोखंडी शेड उभारण्यात येत होती. त्यासाठी मंगळवारी सकाळी अनेक मजूर नेहमीप्रमाणे काम करत होते. यावेळी अचानक संपूर्ण शेडचा लोखंडी सांगाडा खाली कोसळला. हा प्रकार इतका अनपेक्षित आणि वेगवान होता की, तेथे काम करणाऱ्या मजुरांना स्वतःचा बचाव करण्याची संधी मिळाली नाही.

जखमींना तातडीने खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात हलविण्यात आले. यापैकी सुभाष निरंजन यादव या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींपैकी तीन कामगारांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना इतर रुग्णालयांमध्ये हलविण्यात आले आहे. खालापूर पोलीस या दुर्घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

# 'काँग्रेसने आत्मपरीक्षण करावे'



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आता काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर जोरदार पलटवार केला आहे. एसआयआरला दोष देऊ नका, आत्मपरीक्षण करा. गुजरातमध्ये काँग्रेस ४१ वर्षांपासून जिंकलेली नाही. मग हा एसआयआरचा परिणाम आहे का, असा सवाल ना. शाह यांनी केला.

"ज्या मोठ्या राज्यात तुमची एकेकाळी सत्ता होती, तिथे गेल्या ४१ वर्षांत तुम्ही एकही निवडणूक जिंकू शकलेले नाहीत. आताच तीन राज्यांत पोटनिवडणुका झाल्या. पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. जेव्हापासून तुम्ही काँग्रेसचे प्रमुख नेते आणि विरोधी पक्षनेते झाला तेव्हापासून काँग्रेसचा प्रत्येक निवडणुकीमध्ये पराभव होत आहे. याबाबत राहुल गांधी यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे." असे ना. शाह यांनी म्हटले.

# नवीन वर्षापासून राज्यातील प्रमुख महामार्गांवर हवाई रुग्णवाहिका सेवा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी या उद्देशाने नवीन वर्षापासून हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन शासनाकडून करण्यात येत आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.



### परिवहन, आरोग्य आणि पोलीस विभागांचा साधला जाणार समन्वय

अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकते, अशी भूमिका परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भात आयोजित बैठकीत मांडली.

या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय काटकर, वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ. सुनील भारद्वाज यांच्यासह मोटार परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्त्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

## निवडक

### फ्लायदुबई विमान हायजॅकप्रकरणी मालदीवचे दोन वैमानिक ताब्यात

**अबुधाबी :** दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या फ्लायदुबई कंपनीच्या विमानाचे अपहरण आणि वैमानिकावरील हल्ला प्रकरणात यूएईच्या सुरक्षा यंत्रणांनी मालदीवच्या दोन वैमानिकांना ताब्यात घेतले आहे, पण त्यांची ओळख सार्वजनिक करण्यात आलेली नाही. हे दोन्ही वैमानिक मुख्य आरोपीच्या संपर्कात असल्याचा संशय असून आरोपीच्याच इमारतीत राहत होते. त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

### युवराज सिंग दिल्ली कॅपिटल्स संघाच्या प्रशिक्षक ताफ्यात

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटमधील दिग्गज फलंदाज आणि २०११च्या वनडे विश्वचषक विजयाचा हिरो युवराज सिंग आता नव्या भूमिकेत दिसणार आहे. आयपीएल २०२७च्या हंगामापूर्वी दिल्ली कॅपिटल्सने युवराजची सहाय्यक प्रशिक्षक आणि फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. आगामी हंगामासाठी सौरव गांगुली यांच्याकडे मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे युवी आता गांगुलींसोबत मिळून संघाच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करेल.

# पनवेल परिसरात नमो सेवा गाथा नाट्यप्रयोग सादर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात मंगळवारी (दि.१३) नमो सेवा गाथा-अनकही कहानियाँ या विशेष नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या प्रशासकीय सेवाप्रवासातील प्रेरणादायी आणि जनसामान्यांपर्यंत न पोहचलेल्या अनेक महत्त्वपूर्ण प्रसंगांचे दर्शन या नाट्याच्या माध्मातून उपस्थितांना घडवण्यात आले. यावेळी भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

नमो सेवा गाथा-अनकही कहानियाँ हा विशेष नाट्यप्रयोग पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालय आणि कळंबोलीतील न्यू सुधागड स्कूल अशा तीन वेगवेगळ्या ठिकाणी सादर झाला. सेवेची ज्योत प्रत्येक मनात प्रज्वलित करण्याचा संकल्प घेऊन आयोजित या नाट्यप्रयोगावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपमहापौर प्रमिला पाटील, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, नगरसेवक विकास घरत, प्रदीप भगत, दशरथ म्हात्रे, अमर ठाकूर, राजू शर्मा, नगरसेविका हेमलता गोवारी, सरस्वती काथारा, मोनाली ठाकूर, भाऊ भगत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, अमर ठाकूर, दिलीप बिष्ट, अभिषेक पटवर्धन, आर.जी. म्हात्रे, हर्षवर्धन पाटील, शिवाजी भगत, अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा कामोठे मंडळ अध्यक्ष तेजस जाधव, मंदार पनवेलकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि प्रतिसादामुळे हा नाट्यप्रयोग यशस्वीरीत्या पार पडला असून उपस्थितांनी कलाकारांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.

# नालासोपाऱ्यात तरुणीवर अत्याचार

## अनेकींना जाळ्यात ओढल्याचा आरोप

**नालासोपारा : प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यात एका तरुणाने हिंदू तरुणीला लग्नाच्या भूलथापा देऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या आरोपीने ७० ते ८० तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्यासोबत गैरप्रकार केलाचा गंभीर आरोप पीडित तरुणीने केला आहे. यामुळे एकच खळबळ उडाली असून नालासोपारा पोलिसांनी या तरुणावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

आरिफ आयुब शेख (२२) असे या आरोपीचे नाव आहे. त्याने २३ वर्षीय पीडित तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि तिला स्वतःच्या घरी राहण्यास भाग पाडले. त्यानंतर ती आरिफच्या घरी राहण्यास गेल्यानंतर त्याने आपण लवकरच लग्न करणार आहोत, असे सांगत तिच्यावर वारंवार अत्याचार केले.

आरोपी आरिफ शेखने जवळपास ७० ते ८० हिंदू तरुणींना वेगवेगळ्या आमिषांच्या जाळ्यात ओढून त्यांच्यावर अत्याचार केले आहेत. एवढेच नव्हे तर या तरुणींचे अश्लील व्हिडीओ आणि फोटो काढून त्यांचा गैरवापर करण्यात आल्याचा खळबळजनक आरोपही पीडितेने केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# खांदेश्वरच्या माऊलीची अष्टभुजा रूपातील मूर्ती वेधून घेतेय लक्ष!



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जय हनुमान सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ मोठा खांदा आणि पारनेरकर रहिवासी संघ यांच्या वतीने खांदेश्वर रेल्वेस्थानकासमोर कामोठे से. २५ येथे खांदेश्वरची माऊली सार्वजनिक नवरात्रोत्सव आयोजित करण्यात आला आहे. येथील अष्टभुजा रूपातील माऊलीची देखणी मूर्ती भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

खांदेश्वरची माऊली वाघावर विराजमान झाली आहे. देवीच्या मस्तकावरील सोनेरी मुकुट, कपाळावरील लाल कुंकू, नाकातील नथ आणि गळ्यातील सुवर्णालंकारांमुळे तिचे रूप अधिकच खुलून दिसते. देवीच्या दर्शनासाठी खांदेश्वर, कामोठे आणि पनवेल परिसरातील भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. देवीच्या दर्शनासोबतच गरब्याच्या तालावर फेर धरताना दांडियाप्रेमींचा उत्साह ओसंडून वाहत आहे.

### नवरात्रोत्सवात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. उत्सवाचे आयोजक तथा भाजप ओबीसी मोर्चाचे पनवेल शहराध्यक्ष सतीश पाटील आणि पारनेरकर रहिवासी संघाचे सचिव कृष्णा ढोमे यांनी सर्व भाविकांना खांदेश्वरी माऊलीच्या दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# कर्जतमध्ये कत्तल केलेल्या साग वृक्षांची लाकडे जप्त



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील चाफेवाडी, गावंडवाडी परिसरात साग वृक्षांची कत्तल केल्याचा प्रकार समोर आला आहे. वनविभागाने दोन स्वतंत्र प्रकरणांत ३३९ सागवानी लाकडे जप्त केली आहेत.

चाफेवाडी गावंडवाडी परिसरात मोटारकटर मशीनच्या साहाय्याने वृक्षतोड होत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते मनोहर कारोटे यांनी पनवेल येथील वनविभागाचे उपवन अधिकारी माळी यांना दिली. त्यानंतर कर्जत पूर्व उपवन अधिकारी समीर शिंदे यांनी वनकर्मचाऱ्यांसह पाहणी करून झाडांचे लाकूड जप्त केले व कळंब पोई येथील शासकीय डेपोमध्ये जमा करण्यात आले आहे.

याबाबत उपवन अधिकारी समीर शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ज्या क्षेत्रफळावर झाडे तोडण्यात आली आहेत ते स्थानिक शेतकरी धरणी मनोहर गावंड आणि रामा धर्मा गावंड यांच्या मालकीचे आहे. ही वृक्षतोड गणेशोत्सवात झाली असून याप्रकरणी आम्ही आदिवासी कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.



**पनवेल : येथील महापालिकेचे महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मनपा हद्दीत सुरू असलेल्या अतिक्रमणांवरील कारवाईची तीव्रता वाढवावी, अशी मागणी केली.**

# महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्ट अप हब स्थापन करणार -मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : प्रतिनिधी

महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात महिला उद्योजकता हब स्थापन करण्यात येणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि उदैती फाउंडेशन यांच्यात याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सहकार्याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महिला उद्योजकांसाठी अधिक सक्षम वातावरण तयार करण्याच्या आणि महिलांना वित्तपुरवठा, बाजारपेठ व व्यवसाय सहाय्य मिळवून देण्यात येणार आहे. या कराराअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी व उदैती फाउंडेशन तांत्रिक व ज्ञान भागीदार म्हणून कार्य करणार असून राज्य-आधारित महिला स्टार्ट अप हब स्थापन करण्यास मदत करणार आहे. राज्यातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरणासाठी यामुळे चालना मिळणार आहे असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे



कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वात या विभागात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील आणि उदैती फाउंडेशनच्या संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा शर्मा गोयल यांनी या करारावर स्वाक्षरी केली आहे.हा हब राज्यातील स्टार्ट अप परिसंस्थेमध्ये समन्वय साधणारे व्यासपीठ म्हणून काम करेल. शासनाच्या विविध विभाग, परिसंस्था भागीदार आणि सहाय्यक संस्थांना एकत्र आणून महिला उद्योजकांसाठी संधींचे मार्ग अधिक सक्षम करण्याचे काम या हबद्वारे केले जाईल.महाराष्ट्रातील महिला-नेतृत्वाखालील उद्योगांसाठी ॲक्सेलरेटर मॉडेल तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या ॲक्सेलरेटरच्या माध्यमातून मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राची गरज, वित्तपुरवठ्याची उपलब्धता, बाजारपेठीय दुवे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांशी समन्वय साधून उदैती फाउंडेशन महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीला तांत्रिक सहाय्यही देणार आहे.

राज्यासाठी महिला स्टार्ट अप निर्देशांक विकसित करून त्याचे संस्थात्मककरण करण्यासाठीही ही भागीदारी काम करेल. या निर्देशांकाच्या माध्यमातून महिला उद्योजकतेच्या प्रगतीचा आढावा विविध विभाग व जिल्हानिहाय लिंग-विभागित आकडेवारीच्या आधारे घेता येईल. या उपक्रमामुळे पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती अधिक बळकट होईल, विभागांमधील समन्वय अधिक सुलभ होईल.शासनाचे विविध विभाग व जिल्ह्यांतील कामगिरीचे निरीक्षण करण्यासाठी गव्हर्नन्स डॅशबोर्ड विकसित करण्यात येणार आहे, ज्यामुळे वेळोवेळी आढावा घेऊन आकडेवारीवर आधारित निर्णयप्रक्रिया सुलभ होईल. तसेच वुई इंडेक्सच्या अंमलबजावणीस मार्गदर्शन करण्यासाठी आणि शासनातील विविध संस्थांमधील समन्वय मजबूत करण्यासाठी आंतरविभागीय संचालन समिती स्थापन करण्यासही या भागीदारीतून मदत होणार आहे.या सहकार्याद्वारे राज्य नाविन्यता सोसायटी आणि संबंधित विभागांमध्ये लिंग-विभागित आकडेवारीच्या वापरावर आधारित निर्णयप्रक्रिया अधिक मजबूत करण्यासाठी क्षमता विकास उपक्रम राबवले जातील. याशिवाय, ॲक्सेलरेटर आणि वुई इंडेक्सच्या या अंमलबजावणीवर आधारित विविध ज्ञानसंपदा आणि धोरणात्मक निर्णयही घेण्यात येतील.

उदैती फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा शर्मा गोयल म्हणाल्या, "या सामंजस्य करारामुळे महिला आर्थिक सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. राज्यभरातील महिलांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देवून संस्थात्मक यंत्रणा मजबूत करण्यासाठी हा उपक्रम महत्वाची भूमिका बजावेल.

**उदैती फाउंडेशन**

उदैती फाउंडेशन भारतातील महिलांच्या उद्योग क्षेत्रात सहभागाला गती देण्यासाठी कार्यरत आहे.राज्य शासन आणि खासगी क्षेत्रातील उद्योगांसोबत सहकार्य करत १५६ दशलक्ष रोजगारक्षम पण सध्या बेरोजगार असलेल्या महिलांना रोजगाराच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट या संस्थेचे आहे. महिलांना रोजगार मिळविण्यात येणारे अडथळे दूर करणे, महिला उद्योजकांना रोजगार देणारे बनण्यासाठी उद्योजकता परिसंस्था मजबूत करणे, निवास, गतिशीलता आणि बालसंगोपन यांसारख्या महत्वाच्या पायाभूत सुविधांना डेटा-आधारित प्लॅटफॉर्मद्वारे बळकट करणे, ज्यायोगे 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय दृष्टिकोनाला गती मिळेल.

## श्रीवर्धन शहरातील पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन करा -मंत्री तटकरे

मुंबई : प्रतिनिधी

श्रीवर्धन शहरासह रानवली धरणावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लक्षात घेता, उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करून पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन करावे. असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

श्रीवर्धन शहरातील पाणीपुरवठा रानवली धरणावर अवलंबून असलेली पाणी योजना व उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने मंत्रालयात मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी, आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग घेतला, तर जलसंपदा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे तसेच संबंधित अधिकारी मंत्रालयात उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून धरणातील पाण्याची गळती रोखणे, नादुरुस्त पाइपलाइनची तातडीने दुरुस्ती करणे आणि बाष्पीभवनामुळे होणारे पाण्याचे नुकसान कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावयात,रानवली धरणातील पाणीसाठा सध्या ४५ टक्के असून, उपलब्ध पाणीसाठ्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे. श्रीवर्धन शहरासह धरणावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील गावांना पुढील पावसाळ्यापर्यंत पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी पाण्याच्या वापराचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करावे.

पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनची तातडीने पाहणी करून गळती आढळणाऱ्या ठिकाणांची दुरुस्ती करावी. तसेच बाष्पीभवनामुळे होणारे पाण्याचे नुकसान कमी करण्यासाठी व्यवहार्य उपाययोजना राबवाव्यात. धरणातील पाणीसाठा दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी धरणातील गाळ काढण्याच्या कामाला प्राधान्य द्यावे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर कराव्यात.



मुरुड : कला सागर नाट्य संस्था आणि कोकण मराठी साहित्य परिषद मुरुडकडून खासदार सुनील तटकरे यांना प्रसिद्ध रांगोळीकार महेंद्र पाटील यांनी तयार केलेले पोट्रेट भेट देण्यात आले. यावेळी कला सागर नाट्य संस्थेचे अध्यक्ष संजय गुंजाळ व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## पोलादपूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

पोलादपूर : प्रतिनिधी

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि पोलादपूर येथील आपला दवाखाना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले. तपासणी शिबिराचे उद्घाटन पोलादपूर तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर राहुल दवंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आपला दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर गुलाबराव सोनवणे, अमित वैद्य,



डेरवण रुग्णालयाचे पोलादपूर येथील सहकारी समाजसेवक उदय मधुसूदन खरे, पंकज बुटाला तसेच पोलादपूर शहरातील मान्यवर उपस्थित होते.

आपला दवाखाना यांचे कडून दर महिन्याला वालावलकर रुग्णालयाचे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे डॉ. सोनावणे सांगितले. यासंदर्भात वालावलकर रुग्णालयाने शिबीर होण्यासाठी अनुकूलता दर्शवित यानंतरचे आरोग्य शिबीर २६ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले.सकाळी ११ते दुपारी २ वाजेपर्यंत सुरु असलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात स्त्री रोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, कान, नाक व घसा तज्ज्ञ जनरल मेडिसीन व जनरल सर्जन यांच्या उपस्थितीत एकूण ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या मोफत तपासणी शिबिरात अँजिओप्लास्टी, कर्करोग शस्त्रक्रिया, पित्ताशयातील खडे, कान नाक घसा शस्त्रक्रिया, बायपास सर्जरी, मुतखडा, प्रोटेस्ट ग्रंथी आणि मोतीबिंदू या योजनेतून मोफत होणाऱ्या शस्त्रक्रिया आणि योजनेतून अत्यल्प दरात होणाऱ्या शस्त्रक्रियांपैकी हर्निया, महिलांचे गर्भाशयाचे आजार, थायरॉईड शस्त्रक्रिया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया, मुळव्याध व स्तनांमधील गाठी यांची शस्त्रक्रिया, हायड्रो सेल आणि इन प्लांट रिमूव्हल शस्त्रक्रिया यांचा समावेश होणार आहे.

## माथेरानच्या घाटात एसटी मिनीबस बंद! ३५ प्रवाशांचा जीव टांगणीला

नेरळ : प्रतिनिधी

माथेरानच्या नागमोडी घाटरस्त्यावर धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या मिनीबसची दुरवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. प्रवाशांनी भरलेली मिनीबस घाटातच बंद पडल्याने सुमारे ३५ प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. विशेष म्हणजे, गेल्या पंधरा दिवसांतील ही दुसरी घटना असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे माथेरानच्या घाटरस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सोमवारी, १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी नेरळ येथून



माथेरानच्या दिशेने निघालेली शेवटची मिनीबस जुमापट्टी आणि वॉटरपाइप रेल्वे स्थानकादरम्यान घाटातील चढावावर अचानक बंद पडली. बसच्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे सांगण्यात आले. बसमध्ये सुमारे ३५ प्रवासी असल्याची माहिती आहे. अचानक बस बंद पडल्याने प्रवाशांना रस्त्यावर उतरावे लागले. सायंकाळची वेळ, घाटातील चढाव आणि त्यात महिला व पुरुष प्रवाशांची झालेली गर्दी यामुळे प्रवाशांची चांगलीच तारांबळ उडाली.

माथेरानच्या घाटरस्त्यावर एसटी मिनीबस बंद पडणे, ब्रेक निकामी होणे तसेच इंजिनमधून धूर निघणे, अशा घटना सातत्याने समोर येत असल्याची तक्रार आहे. घाटातील तीव्र चढ-उतार आणि वळणांचा विचार करता, अशा तांत्रिक बिघाडांकडे केवळ किरकोळ समस्या म्हणून पाहणे धोकादायक ठरू शकते. सध्या घाटरस्त्यावर प्रवाशांच्या वाहतुकीसाठी एकमेव मिनीबस उपलब्ध असल्याने तिच्यावर मोठा भार आहे. अशा परिस्थितीत बसची नियमित तांत्रिक तपासणी, देखभाल आणि सुरक्षिततेच्या निकषांची काटेकोर अंमलबजावणी होते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

माथेरानच्या घाटरस्त्यावर प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त मिनीबस सुरू करण्याची मागणी अनेकदा करण्यात आली आहे. मात्र, अद्याप या मागणीवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याची प्रवाशांची तक्रार आहे. एकमेव बस बंद पडल्यास प्रवाशांची मोठी गैरसोय होते. सोमवारीही बस बंद पडल्याने प्रवाशांना पर्यायी व्यवस्था शोधावी लागली आणि काहींना जादा पैसे खर्च करून माथेरान गाठावे लागल्याचे सांगण्यात आले.

## कुलदैवत उत्सवानिमित्त पं. उमेश चौधरी यांच्या गायनाची उद्या मैफल

पनवेल : रामप्रहर वृत्त

कुलदैवतावरील श्रद्धा, भक्तिभाव आणि संगीताची सुरेल अनुभूती देणारा पळस्पे येथे श्री कुलदैवत उत्सव २०२६ हा कार्यक्रम गुरुवारी (दि. १५) साजरा करण्यात येणार आहे. गवळी व चोरघे परिवाराच्या वतीने आयोजित या उत्सवानिमित्त रात्री ८ वाजता शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत आणि अभंगवाणीचा विशेष कार्यक्रम रंगणार आहे.

या संगीत मैफलीत प्रसिद्ध गायक, रायगड भूषण



पंडित उमेश चौधरी आपल्या सुमधुर गायनातून रसिकांना स्वरानंदाची अनुभूती देणार आहेत.

त्यांच्यासोबत गायिका कु. ज्ञानेश्वरी गाडगे, संवादिनीवादक कु. कार्तिकी गाडगे, तबलावादक प्रसाद पाध्ये, पखवाज वादक रायगडभूषण गुरुवर्य तालमणी पं. प्रतापराज पाटील आणि टाळवादक गरुडदास कदम हे कलाकार साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन मनोहर मडके करणार आहेत. कुलदैवत उत्सवानिमित्त आयोजित भक्तिमय संगीत सोहळ्याचा लाभ सहकुटुंब, सहपरिवार आणि मित्रमंडळींसह घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हाजी मलंग येथे विद्यार्थिनींची शैक्षणिक सहल; पुस्तकांपलीकडील शिक्षणाचा अनुभव

पनवेल : वार्ताहर

मायनॉरिटी उर्दू गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनींसाठी हाजी मलंग डोंगरावर शैक्षणिक व मनोरंजक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत विद्यार्थिनींना आध्यात्मिक वातावरण, निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक उपक्रम आणि ट्रेकिंगचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. फजरच्या नमाजानंतर पनवेलहून शाळेची बस हाजी मलंगच्या दिशेने रवाना झाली. मुख्याध्यापिका कुदसिया प्रिमुसवाला यांच्यासह शिक्षकवर्ग आणि शाळेची टीम विद्यार्थिनींसोबत उपस्थित होती.

हाजी मलंग येथे पोहोचल्यानंतर विद्यार्थिनींनी दर्यात दर्शन घेऊन प्रार्थना केली. तसेच नात पठण, शेरोशायरी आणि विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. डोंगरावरील ट्रेकिंगमुळे सहलीत साहसाचीही भर पडली. वर्गखोलीबाहेर प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सामूहिक उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, शिस्त, संघभावना आणि परस्पर सहकार्याची भावना विकसित



होण्यास मदत झाली. या सहलीचे आयोजन हलीमाबाई झुलेवाली ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

ट्रस्टचे मुख्य विश्वस्त हनिफ कच्छी हे कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत विद्यार्थिनी आणि शिक्षकांसोबत उपस्थित होते. मुख्याध्यापिका कुदसिया प्रिमुसवाला व शिक्षकांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. भविष्यात अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांसाठीही अशा शैक्षणिक व अनुभवाधारित सहली आयोजित करण्याचा मानस ट्रस्टने व्यक्त केला. ही सहल विद्यार्थिनींसाठी शिक्षण, संस्कृती, आध्यात्मिकता आणि साहस यांचा सुंदर संगम ठरली.

## नागावमध्ये अन्न व औषध प्रशासनातर्फे खाद्यव्यावसायिकांसाठी विशेष मार्गदर्शन

पाली : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील नागाव येथील हॉटेल, रेस्टॉरंट, कॉटेज, रिसॉर्ट, ढाबे, होमस्टे, केटरिंग व्यावसायिक आणि मिठाई दुकानदारांसाठी नागाव ग्रामपंचायत सभागृहात मंगळवारी दि. (१३) रोजी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांची योग्य माहिती, अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि ग्राहकांना सुरक्षित अन्न उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे चर्चासत्र पार पडले.

नागावच्या सरपंच हर्षदा निखिल मयेकर आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेले हे पहिले चर्चासत्र यशस्वी झाले. या चर्चासत्राला अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी



प्रथमेश माने यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ राऊळ यांनी हॉटेल कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य व नियोजन करण्याचे आश्वाशीत केले. या चर्चासत्रात अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी प्रथमेश माने यांनी FDA आणि FSSAI नियमांची अंमलबजावणी, अन्न व्यवसाय परवाना आणि नोंदणी प्रक्रिया, अन्नपदार्थांची सुरक्षित हाताळणी, स्वच्छता तसेच व्यावसायिकांनी पाळावयाच्या महत्त्वपूर्ण नियमांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांनी विचारलेले प्रश्न व शंका यांचं निरसन ही करण्यात आले.

याशिवाय कृत्रिम रंग आणि रासायनिक पदार्थांचा वापर, खाद्यतेलाचा सुरक्षित पुनर्वापर म्हणजेच RUCO नियम, कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी, अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, FoSTaC फूड सेफ्टी प्रशिक्षण, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि तपासणीदरम्यान घ्यावयाची काळजी अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी जागतिक पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त नागाव येथील अन्नपदार्थांचा दर्जा आणि चव यांच्या माध्यमातून नागावचा नावलौकिक केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात आणि जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा निर्धार यावेळी सरपंच हर्षदा मयेकर व उपस्थितीत हॉटेल व रेस्टॉरंट व्यावसायिकांनी व्यक्त केलाय.

अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेबाबत व्यावसायिकांमध्ये जनजागृती करणे, नियमांबाबत असलेल्या शंका दूर करणे आणि भीतीऐवजी योग्य माहितीच्या आधारे नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

# खारघरमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह; १.३८ कोटींच्या भूखंड खरेदीला मान्यता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई परिसरातील शैक्षणिक संस्थांचे जाळे पाहता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी खारघर येथे सरकारी वसतिगृह उभारणे पूरक ठरणार आहे. त्यामुळे पोलादपूर येथे मंजूर झालेले मुलांचे सरकारी वसतिगृह आता खारघर सेक्टर ५ मधील एक हजार १७७ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर उभारण्यात येणार आहे. हा भूखंड एक कोटी ३८ लाख २९ हजार ७९९ रुपयांना खरेदी करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मान्यता दिली आहे.



या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील दुर्गम तालुक्यात मंजूर झालेले वसतिगृह शैक्षणिक सुविधांची अधिक उपलब्धता असलेल्या परिसरात स्थलांतरित होणार आहे. पोलादपूर येथे मुलांचे शासकीय वसतिगृह उभारण्यास २८ जून २००७ रोजी मान्यता देण्यात आली होती, मात्र या तालुक्यात शाळा आणि महाविद्यालयांची संख्या कमी असून एकही व्यावसायिक महाविद्यालय नसल्याने वसतिगृहातील सर्व जागा भरल्या जाण्याची शक्यता कमी होती. त्यामुळे हे वसतिगृह अद्याप सुरू झालेले नव्हते. दुसरीकडे खारघर, पनवेल आणि नवी मुंबई परिसरात व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक महाविद्यालये आणि अन्य शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात असल्याने येथे वसतिगृहाची गरज अधिक होती.

कारण शैक्षणिक संस्थांची उपलब्धता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना निवासाची अडचण भेडसावू शकते. आता खारघरमध्ये जमीन खरेदीला मान्यता मिळाल्याने बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे. मागासवर्गीय मुला-मुलींच्या सरकारी वसतिगृहांमध्ये एकूण प्रवेश क्षमतेपैकी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ८५ टक्के जागा राखीव असतील. २०१८ पासून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी रिक्त राहिलेल्या जागांवर अन्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नाही.

त्यामुळे पोलादपूरसारख्या ठिकाणी वसतिगृहातील सर्व जागा भरण्यात अडचणी येण्याची शक्यता होती. या तीन भागांत मिळून अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन इत्यादी अभ्यासक्रमांच्या ५०हून अधिक नामांकित उच्च शिक्षण संस्था आहेत.

यात सरस्वती महाविद्यालय, भारती विद्यापीठ, अण्णासाहेब चुडामण पाटील महाविद्यालय, पिल्लई महाविद्यालय, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, तेरणा महाविद्यालय, राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था, एनएमआयएमएस, एसआयईएस, आयटीएम आदी संस्थांचा समावेश आहे. पोलादपूरसाठी मंजूर असलेले वसतिगृह पनवेल येथे सुरू करण्याचा विचार झाला होता, मात्र तेथे सरकारी इमारत उपलब्ध नसल्याने खारघरमधील भूखंडावर वसतिगृह उभारण्याचा पर्याय पुढे आला आहे.

# पनवेल मनपाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या सांगता समारोहाचे आयोजन शुक्रवारी (दि. १६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. यानिमित्ताने नागरिकांसाठी खुल्या चित्रकला, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



स्पर्धेमध्ये नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत चित्रकला व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. या स्पर्धा नाट्यगृहाच्या दुसऱ्या मजल्यावर पार पडतील. स्पर्धेसाठी भारतीय राष्ट्रीय प्रतीके (राष्ट्रध्वज, अशोक चक्र, अशोक स्तंभ व कमळ), विकसित भारत २०४७ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विषय ठेवण्यात आले आहेत. स्पर्धकांना या विषयांवर आपली कलात्मकता सादर करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी एकूण ३० भरघोस बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

सेवा संकल्प अभियानांतर्गत निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी नागरिकांकडून २१ ऑक्टोबरपर्यंत निबंध मागविण्यात येणार आहेत. 'विकसित भारत २०४७', 'पंतप्रधान नरेंद्र मोदी' आणि 'डिजिटल साक्षरता' हे निबंध स्पर्धेचे विषय निश्चित करण्यात आले आहेत. या विषयावरील निबंध नागरिकांनी महापालिकेच्या जनसंपर्क कार्यालयात २१ ऑक्टोबरपर्यंत द्यावेत.

नागरिकांमध्ये सर्जनशीलता, सामाजिक जागरूकता आणि राष्ट्रीय विचारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. सेवा संकल्प अभियानाच्या सांगता समारोहानिमित्त आयोजित उपक्रमांमध्ये नागरिकांनी व स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये शनिवारी 'मराठी माझी देवालाही आवडे'; अभिजात मराठीचा सांस्कृतिक सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा, संतसाहित्य आणि संगीत परंपरेचा समृद्ध वारसा उलगडणारा 'मराठी माझी देवालाही आवडे' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम शनिवारी (दि. १७) दुपारी ४ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संतसाहित्य आणि संगीताच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषेचा सांस्कृतिक प्रवास रसिकांसमोर उलगडणे कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मराठी भाषेतील भक्तिरचना, संतवाङ्मय आणि संगीत परंपरेतील भावसौंदर्य यांचा संगम कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक पनवेल तालुका पत्रकार विकास मंच संस्था असून मोठ्या संख्येने रसिका प्रेक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.




या कार्यक्रमात कल्पिता राणे नृत्य सादर करणार असून डॉ. राम पंडित आणि तन्वी गोरे गायन करणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन कल्पिता राणे यांचे असून कल्पिता राणे व कल्पांगण सांस्कृतिक केंद्र हे कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. संगीत साथीमध्ये किरण चिटणीस (तबला), मंदार जाधव (पखवाज) आणि ओमकार चव्हाण (की बोर्ड) यांचा सहभाग आहे. तसेच परिन मोरे आणि अमलेंदु जोशी हे कलाकारही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. कलाकारांचे संयोजन महेश चव्हाण (टीमवर्क्स मीडिया सोल्युशन्स) यांनी केले आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. मराठी भाषा, संतपरंपरा आणि संगीत वारशाचे जतन, संवर्धन व प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

बुधवार सकाळपासून प्रवेशिका फडके नाट्यगृहावर उपलब्ध असतील. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने विनंती करण्यात येत आहे की प्रवेश जरी विनामूल्य असला तरी रसिक प्रेक्षकांनी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके येथून प्रवेशिका प्राप्त करून आसन निश्चिती करून घ्यावी.

# साईनगरमध्ये आज 'खेळ पैठणीचा'ची रंगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पुरस्कृत साईनगर महिला मंडळाच्या वतीने पनवेल येथे आयोजित साईनगरची आई अंबिका सार्वजनिक नवरात्रोत्सव २०२६मध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. या उत्सवाच्या निमित्ताने बुधवारी (दि. १४) महिलांसाठी नितीन गवळी भाऊजींचा खेळ पैठणीचा अर्थात होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



साईसागर सोसायटी, अक्षयपात्र किचनसमोर, साईनगर येथे सायंकाळी ४ ते ७.३० या वेळेत हा कार्यक्रम रंगणार आहे. या कार्यक्रमात महिलांना विविध मनोरंजक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची तसेच कलागुणांना वाव देण्याची संधी मिळणार आहे. विजेत्या महिलांसाठी पैठणी साडी, स्मार्ट टीव्ही, सायकल, मिक्सर, इस्त्री, जेबीएल स्पीकर यांसह विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

११ ते २० ऑक्टोबरदरम्यान सुरू नवरात्रोत्सवात देवी प्राणप्रतिष्ठा, घटस्थापना, दुर्गा सप्तशती पठण, नवचंडी मंत्रजप, रामरक्षा व देवी कवच पठण, कुमारिका पूजन, पारंपरिक गोंधळ, होमहवन आणि महाप्रसाद अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हभप बाळासाहेब लिगाडे महाराज यांचे भजन, बागेश्वर धाम पीठाधीश्वर सद्गुरुदेव भगवान श्री. धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचे सेवक पंडित मोहन जोशी यांचे प्रवचन, महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर, सेवाव्रती महिलांचा सत्कार व हळदी-कुंकू समारंभ उत्सवाचे आकर्षण आहे.

दररोज रात्री ७.३० ते १० या वेळेत लाइव्ह डीजे व ऑर्केस्ट्राच्या साथीने गरबा-दांडियाचे आयोजन करण्यात आले आहे. गरबात सहभागी होणाऱ्यांसाठी एक लाख रुपयांपर्यंतच्या आकर्षक भेटवस्तू, दररोज १० विजेत्यांना बक्षिसे व लकी ड्रॉची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. १९ ऑक्टोबरला होमहवन व महाप्रसाद, तर २० ऑक्टोबरला दसऱ्यानिमित्त शस्त्रपूजन, रावण दहन, सोने लुटण्याचा कार्यक्रम व देवीमूर्ती विसर्जन होणार आहे. साईनगर महिला मंडळाच्या संस्थापक रेणुका नेतकर व अध्यक्षा मिनाक्षी चव्हाण यांच्या पुढाकाराने उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ, धार्मिक परंपरांचे जतन व नागरिकांमध्ये सामाजिक सलोखा वृद्धिंगत व्हावा हा उपक्रमामागील उद्देश आहे. साईनगर तसेच परिसरातील महिला भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नवरात्रोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये मोबाइल चोरणारा जेरबंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरातील वरचे ओवळे, सेक्टर १ येथील इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी झालेल्या मोबाइल चोरीप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी जगदीश गुरुनाथ वाघे (३५) याला अटक केली आहे. या कारवाईत तीन गुन्हे उघडकीस आले असून आरोपीकडून मोबाइल आणि दुचाकी असा एकूण ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान प्लॉट क्रमांक २४९ समोरील बांधकामाच्या ठिकाणी ही चोरी झाली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पठाण, लक्ष्मण जगताप, अनिल चव्हाण, सम्राट डाकी, अभिजित गडकरी, दर्शन म्हात्रे, संजय चौधरी, सचिन पोशिंदे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी जगदीश वाघे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाइल आणि ७० हजार रुपये किमतीची स्कूटर जप्त केली.

# पनवेल महापालिका मुख्यालयात विविध विकासकामांबाबत चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या मुख्यालयात महापौर नितीन पाटील यांच्या समवेत पालिकेच्या कामकाजाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करून विचारविनिमय करण्यात आला. शहराचा सर्वांगीण विकास, नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, प्रलंबित विकासकामे, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, शहराच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक विविध बाबींवर यावेळी चर्चा करण्यात आली.

या बैठकीस सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक परेश ठाकूर, शहर अभियंता राजेश कर्डिले उपस्थित होते. नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन महापालिकेच्या माध्यमातून विकासकामांना गती देणे आणि शहराच्या प्रगतीसाठी समन्वयाने काम करणे यावर यावेळी भर देण्यात आला.



# गोसेवा आयोगाच्या अध्यक्षांची पनवेल पालिका कार्यालयाला सदिच्छा भेट

**पनवेल** : महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त अध्यक्ष शेखर मुंदडा हे श्री पांजरपोळ गोरक्षण संस्था, पनवेल येथे आयोजित पशुसंवर्धन प्रशिक्षण व कृती सत्र शिबिराच्या कार्यक्रमासाठी आले असता त्यांनी पनवेल महानगरपालिका कार्यालयाला सदिच्छा भेट दिली.

पनवेलचे महापौर नितीन पाटील आणि महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक शशिकांत शेळके, उपायुक्त डॉ. वैभव विधाते तसेच इतर मान्यवर आणि महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.



# 'सीकेटी'मध्ये ब्रिक्स समिट सप्ताहाची दिमाखदार सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२१ ते २६ सप्टेंबर हा सप्ताह सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागाने ब्रिक्स समिट सप्ताह म्हणून उत्साहात साजरा केला. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शैक्षणिक कामकाज समितीचे शाळा निरीक्षक संतोष चव्हाण यांनी यासाठी मार्गदर्शन केले होते. हा सप्ताह साजरा करताना विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन व वाद-विवाद तसेच फलक सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



१२ ऑक्टोबर रोजी सप्ताहाची दिमाखदार सांगता करण्यात आली. या सोहळ्यामध्ये विविध स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. एनसीसी विद्यार्थिनींनी संचालन केले आणि इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध देशांचे झेंडे फडकवून पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. पाहुणे आणि सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक शास्त्र विषयाच्या विभाग प्रमुख पूर्वा खेडेकर यांनी केले. त्यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सात दीपस्तंभाचे विश्लेषण केले.

संतोष चव्हाण यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, केवळ शासकीय अध्ययनाच्या पलीकडे जाऊन या उपक्रमाने विद्यार्थ्यांना सहकार्य, एकता, सामर्थ्य आणि ऐक्य यांसारख्या आवश्यक जीवनमूल्यांचे आत्मीकरण करण्यासाठी एक मोलाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ज्यामुळे भविष्यातील प्रगती आणि सामूहिक यशासाठी सहकार्याची भावना वाढीस लागेल. तसेच आगामी काळातही शाळा अशा प्रकारच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी सतत प्रेरित करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. इयत्ता नववीच्या रिंकल ज्ञानेश्वर पाटील आणि सेजल शेळके या विद्यार्थिनींनी सादरीकरण फलकाचे उत्कृष्ट विश्लेषण पाहुण्यांसमोर केले.

इयत्ता दहावीचा विद्यार्थी रिषभ देशमुख याने पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून ब्रिक्सबद्दल माहिती दिली. तनिष्का गावडे आणि शमिका कदम या विद्यार्थिनींनी ब्रिक्सबद्दलचे विचार सादर केले.

इयत्ता दहावी क ची विद्यार्थिनी आस्था म्हात्रे हिने ब्रिक्स समिटवर आधारित नाटिका सादर केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वा खेडेकर यांच्यासह विद्यार्थी संस्कृत रोहेकर आणि दिशा लाखन यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका निरजा अदुरी तसेच विद्यालयाचे संगीत शिक्षक रुपेश मढवी, संतोष खैरे, इतिहास शिक्षिका योगिता पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

## संपादकीय

# नियोजन व लोकसहभाग

पावसाने ओढ दिली की त्याची झळ शेतकऱ्यांना बसते हे चित्र सगळ्यांना परिचित आहे. मात्र यंदा पावसाच्या तुटीचे संकट केवळ शेतांपुरते मर्यादित राहिलेले दिसत नाही. शहरांमधील पाणीपुरवठ्यावरही त्याचे सावट पडू लागले आहे.

पुढील पावसाळ्यापर्यंत पाण्याची गरज भागविण्याचे आव्हान आज देशभरात प्रशासनासमोर आहे. त्यामुळे पाण्याची बचत आता प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य बनले आहे. देशव्यापी चित्र पाहता पाणीटंचाई काही एका राज्याची समस्या राहिली नाही. कर्नाटक व आंध्र प्रदेशातही यंदाच्या पावसातील तुटीने गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण केली. इतर राज्यांमध्येही भूजलाचा घटता स्तर आणि पाण्याचे असमान वितरण ही आव्हाने आहेत. महाराष्ट्रातील परिस्थितीची तुलना १९७२ च्या भीषण दुष्काळाशी केली जात आहे. राज्यभरातील धरणसाठ्याचे चित्र सावध करणारे आहे. आठवडाभरापूर्वी तीन हजार जलप्रकल्पांमध्ये उपयुक्त पाणीसाठा ७४ टक्के होता. मागील वर्षी याच काळात तो ९० टक्के होता. ऑक्टोबरमधील उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढून पाणीसाठा कमी होण्याची शक्यता आहे. सर्व जिल्ह्यांत पावसाची स्थिती सारखी नव्हती. त्यामुळे पावसाची सरासरी आकडेवारी पाहून निर्धास्त राहणे धोक्याचे आहे. म्हणूनच राज्य सरकारने शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान दहा टक्के पाणीकपातीचे निर्देश दिले. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतच्या गरजांचा विचार करून धरणनिहाय पाणी नियोजन, प्रत्येक धरणात दहा टक्के आपत्कालीन साठा राखणे, गळती रोखणे व सांडपाण्याचा पुनर्वापर यांवर भर देण्यात आला आहे. उद्योगांना किमान तीस टक्के पाण्याचा पुनर्वापर करण्यास सांगण्यात आले. मुंबईत किमान दहा टक्के पाणीकपात लागू असून बांधकाम प्रकल्पांचा पाणीपुरवठा बंद करण्याबरोबरच पालिकेच्या जलतरण तलावांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याचाही फेरविचार सुरू आहे. नवी मुंबईतही पुन्हा पाणीकपातीची शक्यता व्यक्त करण्यात आली. पुणे शहरात आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर व वाहन धुण्याची केंद्रे यांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. जालनातील भोकरदनसारख्या शहरात तर उपलब्ध पाणीसाठा जेमतेम पंधरा दिवस पुरण्याची स्थिती नोंदली गेली. केंद्राकडूनही जलसंधारण, भूजल पुनर्भरण व लोकसहभागातून पाणी साठवण्याच्या योजना राबवल्या जात आहेत. पाण्यासंदर्भात केंद्र व राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था व नागरिक यांच्यातील समन्वय निर्णायक ठरणार आहे. सरकारच्या उपाययोजनांना नागरिकांची साथ मिळाली तरच त्यांचे अपेक्षित परिणाम दिसतील. घरांमधील नळगळती दुरुस्त करणे, गाड्या धुण्यासाठी पाइपऐवजी बादली, आंघोळीसाठीही शॉवरचा वापर टाळणे, फ्लशकरिता पाणी जपून वापरणे, सोसायट्यांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा बागकामासाठी पुनर्वापर आदी उपाययोजना सर्व शहरी भागांत आवश्यक असून सर्वांनी गांभीर्याने अवलंब केला पाहिजे. जलतरण तलाव, क्रीडा संकुले, हॉटेल्स व बांधकाम व्यावसायिकांनीही पाण्याचा अनावश्यक वापर टाळून पुनर्वापराची व्यवस्था उभारली पाहिजे. आजची पाण्याची बचत उद्याच्या संकटाची तीव्रता कमी करू शकते. पाऊस किती पडतो हे आपल्या हातात नसले तरी उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि त्याचा काटकसरीने वापर करणे आपल्या हातात आहे. सरकार प्रयत्न करेल, प्रशासन उपाययोजना करेल, पण लोकसहभागाशिवाय या संकटाचा सामना करता येणार नाही.

# संवैधानिक संस्थांवरील दबावाचे राजकारण!



लोकशाहीत मतभेदांना स्थान आहे; मात्र संवैधानिक संस्थांवरील जनतेचा विश्वास अबाधित राखणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची जबाबदारी आहे. भारतीय लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती संविधान, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि संवैधानिक संस्थांच्या प्रतिष्ठेवर उभी आहे. या संस्थांवरील नागरिकांचा विश्वास हा लोकशाहीचा खरा आधार आहे. त्यामुळे राजकीय मतभेद व्यक्त करताना किंवा एखाद्या निर्णयाला विरोध करताना संवैधानिक संस्थांच्या स्वायत्ततेचा आणि प्रतिष्ठेचा आदर राखणे अत्यंत आवश्यक आहे.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसकडून सर्वोच्च न्यायालयासारख्या सर्वोच्च संवैधानिक संस्थेच्या संदर्भात आंदोलनाची भूमिका घेतली जात असेल, तर त्या भूमिकेचा उद्देश, स्वरूप आणि त्याचे संभाव्य परिणाम यावर गांभीर्याने चर्चा होणे गरजेचे आहे. न्यायालयाच्या निर्णयांवर टीका करणे किंवा लोकशाही मार्गाने असहमती व्यक्त करणे हा नागरिकांचा आणि राजकीय पक्षांचा अधिकार आहे, मात्र न्यायालयाच्या कामकाजावर अनुचित दबाव निर्माण होईल किंवा जनतेमध्ये न्यायव्यवस्थेबद्दल संभ्रम निर्माण होईल अशी परिस्थिती टाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### १९७५ची आणीबाणी आणि आजच्या लोकशाहीसमोरील प्रश्न

भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील २५ जून १९७५ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आणि वादग्रस्त ठरला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सरकारने देशात आणीबाणी लागू केली. या काळात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर निर्बंध आले. विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक करण्यात आली आणि प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावरही मर्यादा आल्या. आणीबाणीचा काळ हा भारतीय लोकशाहीसाठी एक गंभीर धडा आहे. सत्तेचा वापर, नागरिकांचे अधिकार आणि संवैधानिक संस्थांचे स्वातंत्र्य यांचे महत्त्व या काळाने अधोरेखित केले. त्या ऐतिहासिक घटनेची आजच्या राजकीय घडामोडींशी तुलना करताना संबंधित घटनांमधील कायदेशीर आणि घटनात्मक फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. १९७५मध्ये सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्यात आला नव्हता, असा दावा करण्यापूर्वी त्याची ऐतिहासिक पडताळणी होणे गरजेचे आहे, मात्र त्या काळात न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या अधिकारांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

### सर्वोच्च न्यायालयाची प्रतिष्ठा राष्ट्राच्या विश्वासाशी जोडलेली

भारताचे सर्वोच्च न्यायालय हे संविधानाचे संरक्षण करणारी सर्वोच्च न्यायिक संस्था आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि शासनाच्या कृतींची घटनात्मक वैधता तपासण्यात न्यायव्यवस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. न्यायालयाच्या निर्णयांशी असहमती असू शकते. त्यासाठी कायदेशीर उपाय, पुनर्विचार याचिका, पुनर्विलोकन किंवा इतर उपलब्ध घटनात्मक मार्गांचा अवलंब करता येतो, परंतु आंदोलनाचे स्वरूप असे असावे की त्यातून न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राहील आणि न्यायप्रक्रियेवर अनुचित दबाव निर्माण होणार नाही. न्यायालयाच्या परिसरात आंदोलन झाले म्हणून प्रत्येक वेळी लोकशाहीला धोका निर्माण झाला, असा निष्कर्ष काढता येत नाही. आंदोलनाचा उद्देश, पद्धत, संबंधित कायदे आणि न्यायालयाच्या कामकाजावर झालेला परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे. लोकशाहीत निषेधाचा अधिकार आणि न्यायसंस्थेची स्वायत्तता या दोन्ही मूल्यांचे संरक्षण झाले पाहिजे.

### राजकीय जबाबदारी आणि लोकशाहीचे भविष्य

राजकीय पक्षांनी नागरिकांसमोर प्रश्न उपस्थित करावेत, सरकारला जाब विचारावा आणि अन्यायाविरोधात आवाज उठवावा, परंतु या प्रक्रियेत नागरिकांमध्ये अनावश्यक संभ्रम निर्माण होणार नाही आणि संवैधानिक संस्थांवरील विश्वास कमकुवत होणार नाही याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारतासारख्या विशाल लोकशाही देशात राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे, मात्र मतभेदांचे निराकरण संविधानाच्या चौकटीत होणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. संसद, न्यायपालिका, निवडणूक आयोग आणि इतर संवैधानिक संस्थांबाबत चर्चा करताना पुराव्यांवर आधारित भूमिका मांडणे आणि संस्थांच्या स्वायत्ततेचा आदर राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. लोकशाही मजबूत होते ती संस्थांवर आंधळा विश्वास ठेवल्याने नव्हे, तर संस्थांची स्वायत्तता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व जपल्याने.

१९७५च्या आणीबाणीचा इतिहास आपल्याला सत्तेच्या मर्यादांची जाणीव करून देतो. आजही राजकीय पक्षांनी संविधानाच्या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांवर मतभेद असू शकतात, मात्र ते व्यक्त करताना कायद्याचे राज्य, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि लोकशाहीवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवणे आवश्यक आहे, कारण शेवटी संविधानाचा सन्मान, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि नागरिकांचा विश्वास हेच भारतीय लोकशाहीचे खरे सामर्थ्य आहे.

**–ॲड. चेतन जाधव**, पनवेल

# शासनाच्या दूरदृष्टीने दुष्काळात दिलासा

अल निनोच्या प्रभावामुळे यंदा केवळ दुष्काळाचे सावट नाही, तर राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष दुष्काळ येऊन ठेपला आहे. पीक हाती येण्याच्या काळातच उन्हामुळे पिके वाळून गेली असून त्यांचे पंचनामे सुरू आहेत. एरव्ही या काळात हिरवीगार दिसणारी शेते दुष्काळामुळे काळी–पिवळी पडली आहेत. वातावरणातील बदलांमुळे निर्माण झालेली ही दुष्काळी स्थिती शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणणारी आहे.

त्याचवेळी या दुष्काळावर सर्व शक्तीनिशी मात करण्याचा राज्य शासनाचा संकल्प दिलासादायक आहे. अशा संकटावर मात करायची तर दूरदृष्टी असावी लागते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र सरकारने हीच दूरदृष्टी दाखवत केलेल्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नागपूर आणि अमरावती विभागात कापूस, सोयाबीन, तूर, धान आणि इतर पिकांवर ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. मात्र, अनियमित पाऊस, पावसातील खंड, भूजल पातळीतील घट आणि सिंचनाच्या मर्यादित सुविधा यांमुळे विदर्भातील अनेक भागांना वारंवार पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करावा लागतो.

दरम्यान, दुष्काळ निवारण हा केवळ पाणीपुरवठ्याचाच प्रश्न नसून शेती, रोजगार, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनाशी निगडित महत्त्वाचा विषय आहे. दुष्काळावर दीर्घकालीन उपाय म्हणून शासनाने जलयुक्त शिवार अभियान राबविले. या अभियानांतर्गत नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण, सिमेंट नालाबांध, मातीचे बंधारे, शेततळी आणि पावसाचे पाणी अडवण्यासाठी विविध कामे करण्यात आली. पुढे जलयुक्त शिवार अभियान २.० सुरू करण्यात आले. जलसंधारणाच्या कामांसोबत जलसाक्षरता व उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावरही भर देण्यात आला. प्रत्येक कामामुळे किती पाणी अडले, भूजल पातळीत किती सुधारणा झाली याचे मूल्यमापनही सरकार करीत आहे. धरणे, तलाव व बंधाऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे साचणारा गाळ पाणीसाठवण क्षमतेवर परिणाम करतो. ही क्षमता वाढविण्यासाठी राज्यात 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' योजना राबविण्यात येत आहे.

**–संचालक (माहिती) कार्यालय, नागपूर**



## बदलते तंत्रज्ञान

# क्रेडिट कार्ड घोटाळा म्हणजे काय?



क्रेडिट कार्ड घोटाळा हा सायबर फसवणुकीचा एक प्रकार आहे ज्यामध्ये घोटाळेबाज तुमचा कार्ड नंबर, सीव्हीव्ही, एक्सपायरीची तारीख, ओटीपी किंवा पिन यासारखी संवेदनशील माहिती फसवणूकीने मिळवतात. ते तुमच्या खात्यातून पैसे काढण्यासाठी किंवा ऑनलाइन खरेदी करण्यासाठी या माहितीचा वापर करतात.

फसवणूक करणारे बनावट कॉल, ईमेल किंवा संदेशांद्वारे तुमचे कार्ड तपशील, ओटीपी किंवा पिन मिळवतात. कधीकधी, ते स्वतःला बँक प्रतिनिधी किंवा विश्वासार्ह कंपन्या म्हणून ओळखतात आणि बनावट ऑफर किंवा रोख ऑफर देऊन तुम्हाला आमिष दाखवून तुमची माहिती मिळवतात. एकदा त्यांच्याकडे हे तपशील आले की, स्कॅमर कार्ड वापरून व्यवहार करतात आणि पैसे काढतात.

क्रेडिट कार्ड फसवणूक टाळण्यासाठी दक्षता आणि अचूक माहिती आवश्यक आहे. क्रेडिट कार्ड वापरताना थोडीशी काळजी घेतल्यास फसवणुकीपासून तुमचे संरक्षण होऊ शकते. उदाहरणार्थ:

तुमच्या कार्डची माहिती कोणाशीही शेअर करू नका

तुमचा पिन, पासवर्ड किंवा ओटीपी कधीही कोणाशीही शेअर करू नका, मग तो मित्र असो, नातेवाईक असो किंवा ज्याच्याशी तुम्ही फोनवर बोलत असाल.

बक्षीस किंवा लॉटरीच्या घोटाळ्यांना बळी पडू नका

जर कोणी तुम्हाला ईमेल किंवा मेसेज पाठवला की, तुम्ही लॉटरी जिंकली आहे किंवा पैसे मिळणार आहेत, पण तुम्हाला आधी काही कर किंवा शुल्क भरावे लागतील, तर ती फसवणूक आहे. अशा लोकांना कधीही पैसे देऊ नका.

पैसे देण्यापूर्वी विचार करा. लोक बनावट वेबसाइट किंवा लिंक्स ईमेल किंवा मेसेजद्वारे पाठवतात ज्या खऱ्या दिसत असतात. त्यावर क्लिक करू नका आणि तुमची माहिती भरू नका. खऱ्या बँका कधीही तुमची वैयक्तिक माहिती विचारून फोन किंवा ईमेल करत नाहीत.

तुमचे कार्ड कधीही नजरेआड होऊ देऊ नका जर तुम्ही तुमचे कार्ड रेस्टॉरंट किंवा पेट्रोल पंपावर देत असाल, तर ते तुमच्या समोर स्वाइप केले आहे याची खात्री करा. जर मशीन विचित्र वाटत असेल तर सावधगिरी बाळगा.

एक कार्ड ऑटोपेसाठी आणि दुसरे दैनंदिन वापरासाठी ठेवा.

# टीम इंडियाचे प्रशिक्षक गौतम गंभीर



## निमित्त

भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांचा आज जन्मदिन. त्याचा जन्म १४ ऑक्टोबर १९८१ रोजी झाला. त्याचे वडील दीपक गंभीर हे कापड व्यापारी असून आईचे नाव सीमा आहे. गौतमला एकता नावाची एक छोटी बहीण आहे, जी त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान आहे. त्यांच्या जन्माच्या केवळ १८ दिवसानंतर आजोबा आणि आजी त्यांना वाढवण्यासाठी त्यांच्याबरोबर घेऊन गेले आणि तेव्हापासून ते एकत्र आहेत.

गंभीरने वयाच्या दहाव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्यांनी मॉर्डन स्कूल, नवी दिल्ली आणि नंतरचे शिक्षण हिंदू कॉलेजमध्ये पूर्ण केले. ते ९०च्या दशकात आपल्या काका पवन गुलाटी यांच्या घरी राहत होते आणि त्यांना गुरू मानतात. कोणत्याही महत्त्वाच्या सामन्यापूर्वी अनेकदा ते त्याला कॉल करतात. त्यांना दिल्लीच्या लालबहादूर शास्त्री अकॅडमीचे राजू टंडन आणि संजय भारद्वाज यांनी प्रशिक्षित केले. २००० साली त्यांची बेंगळुरू मध्ये राष्ट्रीय क्रिकेट अकादमीसाठी निवड झाली.

गौतम गंभीर हा डाव्या हाताचा सलामीवीर फलंदाज आहे जो दिल्लीकडूनही घरगुती क्रिकेट खेळतो आणि आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सचा कर्णधारही आहे. २००३मध्ये त्याने बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि त्यानंतरच्याच वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला. २०१० ते २०११ दरम्यान त्याने इंटरनॅशनल सामन्यांमध्ये भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघाचे नेतृत्वही केले आहे, त्याच्या नेतृत्वात भारताने सहा सामन्यांत सहा सामने जिंकले. २००७ वर्ल्डकपच्या दोन्ही फायनल्समध्ये भारताने जिंकलेला २००७ वर्ल्ड टी–२० (५४ चेंडूत ७५ धावा) आणि २०११ क्रिकेट विश्वचषक (११२ चेंडूत ९७ धावा) महत्त्वपूर्ण खेळी खेळल्या.

२००८मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००९मध्ये आय.सी.सी. कसोटी क्रमवारीत तो जगातील नंबर एकचा फलंदाज ठरला. त्याच वर्षी त्याला आयसीसी टेस्ट प्लेअर ऑफ द इयर पुरस्कारही देण्यात आला.

इंडियन प्रीमियर लीगच्या पहिल्या खेळाडूंच्या लिलावात एक वर्षासाठी दिल्ली डेअरडेव्हिल्स फ्रँचायझीने गंभीरची निवड केली होती, ज्याची किंमत ७२५,००० अमेरिकन डॉलर्स आहे. त्याने पहिल्या सामन्यात १४ सामन्यांत ५३४ धावा करून दुसऱ्या सर्वाधिक धावा केल्या. २०१० च्या आयपीएल हंगामात त्याला दिल्ली डेअरडेव्हिल्सचा कर्णधार म्हणून बढती देण्यात आली. स्पर्धेच्या शेवटी दिल्ली डेअरडेव्हिल्सचा तो एकमेव खेळाडू होता जो आयपीएलमध्ये १०००हून अधिक धावा करू शकला.

२०११च्या आयपीएलच्या लिलावात गंभीरला सर्वाधिक पसंती देण्यात आली होती. गंभीरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलच्या प्लेऑफसाठी पात्रता मिळविली आणि चॅम्पियन्स लीग ट्वेंटी –२० मध्ये प्रथमच प्रवेश केला. अखेरीस त्याने चेन्नईच्या घरच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जचा पाच गडी राखून पराभव करून चॅम्पियन्सला पहिले जेतेपद मिळवून दिले. त्याच मोसमात त्याने आपल्या संघाकडून एकूण नऊपैकी सहा अर्धशतके झळकावली आणि २००० धावांचा टप्पा पार करून स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची नोंद करणारा आयपीएल इतिहासातील दुसरा खेळाडू ठरला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर



# आंबवलेले पदार्थ खाण्यास कितपत चांगले?

निरोगी राहण्यासाठी, योग्य जीवनशैली आणि खाण्यापिण्याकडे लक्ष देणे खूप महत्त्वाचे आहे, परंतु प्रत्येक प्रकारच्या अन्नामध्ये वेगवेगळे पोषक घटक असतात, जसे की दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात आणि लिंबूमध्ये असलेले व्हिटॅमिन सी त्वचेसाठी खूप फायदेशीर असते. आंबवलेले पदार्थदेखील यापैकी एक आहेत.

### कोणते पदार्थ आंबवलेले असतात?

इडली, डोसा, दही, दही, ताक आणि लोणचे अशा अनेक पदार्थांचा आंबवलेल्या पदार्थांमध्ये समावेश होतो. या पदार्थांचे आपण नियमित सेवनदेखील करतो. उदाहरणार्थ, उन्हाळ्यात अनेक लोकांना जेवणासोबत दही खायला आवडते आणि काही लोकांना दररोज लोणचे खायला आवडते.

### आंबवलेल्या पदार्थांमध्ये कोणते गुणधर्म असतात ?

आंबवलेल्या अन्नामध्ये चांगले बॅक्टेरिया म्हणजेच प्रोबायोटिक्स असतात, जे आतड्यांसाठी फायदेशीर असतात आणि पचनसंस्था मजबूत करतात. यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचन यासारख्या समस्यांपासून आराम मिळू शकतो. या पदार्थांमुळे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आणि शरीरात पोषक तत्वांचे शोषण वाढवतात.

### अनेकांना समस्यादेखील येऊ शकतात

हे काही लोकांना हानी पोहोचवू शकते, विशेषतः ज्यांना पोटाचे अल्सर आणि आम्लपित्त समस्या आहेत किंवा ज्यांना दुधाची ऍलर्जी आहे. जास्त आंबवलेले किंवा आंबट अन्न खाल्ल्याने आम्लपित्त आणि पोटफुगीची समस्या वाढू शकते.

आंबवलेले पदार्थ खाण्याआधी आंबवलेले पदार्थ ताजे आणि योग्य प्रमाणात खाणे महत्वाचे आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या पॅकेज केलेल्या आंबवलेल्या अन्नपदार्थांमध्ये प्रिझर्वेटिव्हज आणि मीठ जास्त प्रमाणात असू शकते, जे आरोग्यासाठी चांगले नाही. म्हणून, ते घरी तयार करून खाणे चांगले राहील. जर तुमचे आरोग्य सामान्य असेल तर दिवसातून एक किंवा दोनदा आंबवलेले पदार्थ समाविष्ट करणे फायदेशीर ठरू शकते. परंतु जर तुम्हाला कोणताही विशिष्ट आजार असेल तर प्रथम डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# रायगड जिल्ह्यात भाताचे उत्पादन घटणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमी झालेले भात लागवड क्षेत्र. एल निनोमुळे पर्जन्यमानात आलेली तूट. शेतात पणी नसल्यामुळे नभरलेले दाणे. करपत चालेली शेती. भात पीकावर होत असलेला कीडरोगाचा प्रादुर्भाव यामुळे रायगड जिल्ह्यात यंदा भाताच्या उत्पादनात मोठी घट होणार आहे.

रायगड जिल्ह्यात भात लागवडीचे सरासरी ८७ हजार ५३६ हेक्टर क्षेत्र आहे. मागील वर्षी ७० हजार ४४६ हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली होती. ८६. ७३ टक्के क्षेत्रात भात लागवड करण्यात आली होती. यंदा ६१ हजार १०१ हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली. यंदा ६९.८० टक्के क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली. मागरी वर्षाच्या तुलनेत यंदा १७ टक्के कमी क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याचे वार्षिक पर्जन्यमान ३१४८.६ मिमी आहे. यंदा २८९४.७ मिमी पाऊस पडला. यंदा वार्षि पर्जन्यमानाच्या ९० टक्के पाऊस पडला आहे. एल निनोमुळे पाऊस उशिरा पडला. जून महिन्यात पहिल्या पंधरवड्यात पावसाचा खंड पडला. जलै महिन्यात कमी कालावधीत जास्त पाऊस पडला. जून केवळ ११ दिवस पाऊस पडाला. जून महिन्यात ५१.१ टक्के पाऊस पडला. जुलै महिन्यात २५ दिवस पाऊस पडला. जुलै महिन्यात १२०६.९ मिमी पाऊस पडतो. यंदा १८४३.९ मिमी पाऊस पडला. जुलै महिन्यात सरासिरीच्या १५२ टक्के पाऊस पडला. जुलै महिन्यात कमी दिवसात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. त्यामुळे शेतीचे नुकसान झाले. ऑगस्ट महिन्यात ५९.३ टक्के तर सप्टेंबर महिन्यात ४७.९ टक्केच पाऊस पडला.

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांमध्ये पाऊस कमी पडला. त्या तुलनेत उन्हाची तीव्रता जास्त होती. त्यामुळे शेतातील पाण्याचे बाष्पीभवन झाले. शेतात पाणी राहीले नाही. शेतात भेगा पडल्या. रोप फुटव्याच्या अवस्थेत असताना पाणी न मिळाल्यामुळे रोपांची वाढ थांबली. भात रोपे दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पाणी आश्यक असते. याच कालावधीत पाऊस पडला नाही. त्यामुळे कणस पोकळ राहणार आहेत. सध्या पाऊस नसल्यामुळे भात रोपे करपू लागली आहेत. भात शेतीवर कीड रोगांचा प्रदुर्भाव होऊ लागला आहे. माणगाव तालुक्यात पक्षांनी रोपवाटीकेतील बियाणे खाल्ली. पोलदपूर व श्रीवर्धन तालुक्यांमध्ये वन्य प्राण्यांचा प्रादुर्भाव झला. त्यामुळे रायगड जिल्ह्यात यंदा भाताच्या उत्पादानात मोठ्या प्रमाणावर घट होणार आहे.

**रायगड जिल्ह्यातील पिक परिस्थितीचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. शासनाचे निर्देश आल्यानंतर पुढील कार्रयवाही करण्यात येईल.**

**–वंदना शिंदे, कृषी अधीक्षक, रायगड**

# चावणे येथील कंपनीतील १२ हजारांच्या प्लेट चोरीला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चावणे गाव परिसरात असलेल्या रिटेक इमविरोटेक प्रा. लि. कंपनीत घरफोडी करून सुमारे १२ हजार रुपये किमतीच्या ताब्यांच्या प्लेट चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चावणे गावच्या हद्दीतील रिटेक इमविरोटेक प्रा. लि. कंपनीत ही चोरी झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कंपनीतील सुमारे एक किलो वजनाच्या एकूण १२ ताब्यांच्या प्लेट, प्रति किलो एक हजार रुपये या दराने एकूण १२ हजार रुपये किमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.या प्रकरणी कंपनीत सुपरवायझर म्हणून कार्यरत असलेले ४३ वर्षीय कर्मचारी यांनी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनास्थळी पंचनामा ई–साक्ष ॲपद्वारे करण्यात आल्याची नोंद आहे. फॉरेन्सिक पथकाला कळविण्यात आले असून, पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

# बोर्ली मांडला परिसरातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बोर्ली मांडला येथील भोईघर फाटा परिसरातून १७ वर्षे ७ महिन्यांची अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास भोईघर फाटा येथील दुकानातून खाऊ घेऊन येते, असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र, ती घरी परतली नाही. अज्ञात व्यक्तीने मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिच्या अजाणतेपणाचा फायदा घेत, तिला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून त्यांच्या संमतीशिवाय फूस लावून पळवून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार सुर्वे करीत आहेत.

**भरती - सुरक्षा रक्षक**

पगार : रु. 25,000 – रु. 28,000

**ड्युटी :** 12 तास

**वय :** 21 ते 50 वर्षे

**शैक्षणिक पात्रता**
किमान 10 वी पास

**पद :** सिक्युरीटी गार्ड

**पीएफ/ईएसआयसी/बोनस**

**आठवड्याला 1 दिवस सुट्टी**

**लोकेशन :** अजिवली गाव, पळस्पा फाट्याजवळ पनवेल.

**: संपर्क :**
8082592990
8082592995

# माथेरानमध्ये भटक्या कुत्र्याचा चिमुरडीला चावा

**माथेरान : बातमीदार**

सकाळी शाळेत जात असताना अनुष्का अनिल कोकरे या शाळकरी मुलीला माथेरान मधील सागर डेअरी जवळ भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला करून तिच्या पायाला चावा घेतला.या घटनेत तिच्या पायाला गंभीर जखम झाली असून तिला तातडीने माथेरान बी.जे.रुग्णालयात दाखल करण्यात आले.तिथे तिच्यावर उपचार करून तिला घरी सोडण्यात आले.

यामुळे येथे भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर आला असून शालेय विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांचा सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला जात आहे.स्थानिक प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

माथेरानच्या मुख्य महात्मा गांधी रस्त्यावर अनेक ठिकाणी भटकी कुत्री रस्त्याच्या मधोमध बसलेली किंवा खेळताना दिसतात.याच महात्मा गांधी रस्त्यावरून तिन्ही शाळेची शाळकरी मुले,पर्यटक आणि स्थानिक नागरिकांची सतत ये–जा सुरु असते.अशा परिस्थितीत अचानक कुत्र्याने चावा घेतल्याने येथील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. माथेरान नगरपालिकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात,अशी मागणी नागरिकांकडून लेखी स्वरूपात केली जात आहे.विशेषतःशालेय परिसरात आणि मुख्य रस्त्यांवर नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

# गोंड्याची आवक वाढली, पण विक्री घटली!



**महाड : प्रतिनिधी**

दसरा सणामध्ये ज्या गोंडा फुलाला मोठी मागणी असते, त्या मागणीचा अंदाज घेऊन विक्रेत्यांनी पहिल्या दिवसापासूनच गोंडा मोठ्या प्रमाणात खरेदी करून आणला. मात्र, यंदा या फुलाला अपेक्षित मागणी मिळत नसल्याने विक्रेत्यांनी अक्षरशः डोक्याला हात लावला आहे. गोंड्याच्या फुलांची आवक वाढली असली, तरी विक्री मात्र मंदावल्याने फुलविक्रेत्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

दसरा म्हटला की झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व असते. घराची सजावट, वाहनपूजा, दुकानांची सजावट तसेच विजयादशमीच्या पूजेसाठी झेंडूच्या फुलांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर फुलविक्रेते मोठ्या आशेने बाजारात फुले विक्रीसाठी आणतात. यंदाही चांगली विक्री होईल, या अपेक्षेने विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात गोंडा खरेदी केला होता. मात्र, प्रत्यक्ष बाजारपेठेत ग्राहकांची अपेक्षित गर्दी दिसून येत नसल्याने विक्रेत्यांची निराशा झाली आहे. फुले विक्रीसाठी आणल्यानंतर ती वेळेत विकली गेली नाहीत, तर कोमेजण्याची शक्यता असते. त्यामुळे खरेदीसाठी केलेली गुंतवणूक वसूल करणेही विक्रेत्यांना कठीण झाले आहे. परिणामी, काही विक्रेत्यांना कमी दरात फुले विकण्याची वेळ येत असून, अपेक्षित नफा मिळणे दूरच; खरेदीचा खर्च तरी निघेल का, अशी चिंता त्यांना सतावत आहे.

सद्या महाडमध्ये प्रति किलोला शंभर रुपये दर लावला आहे. मागणी दिसत नसल्याने छोट्या विक्रेत्यांनी हा दर शंभर रुपयावरून ८० रुपये पर्यंत आणला आहे. गोंडा जास्त टिकत नसल्याने या विक्रेत्यांना मोठी चिंता लागून राहिले आहे.

# बोर्ली नाक्यावर पाण्याची गळती; दररोज हजारो लिटर पाणी वाया

## ◆ संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष, ग्रामस्थांमध्ये संताप

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बोर्ली नाका येथील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेली पाण्याची गळती अद्यापही कायम आहे. दररोज हजारो लिटर पाणी रस्त्यावरून वाहून वाया जात असतानाही संबंधित यंत्रणेकडून ठोस कार्यवाही होत नसल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे, या मार्गावरून लोकप्रतिनिधींचीही नियमित ये–जा सुरू असताना या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



बोर्ली नाका येथील मुख्य रस्त्याचे सुमारे दोन वर्षांपूर्वी काँक्रिटीकरण करून नूतनीकरण करण्यात आले होते. मात्र, सध्या या रस्त्यावरून सातत्याने पाणी वाहत असून, काँक्रिटच्या रस्त्याच्या मध्यभागातून पाणी बाहेर येत असल्याचे दिसून येत आहे. ही गळती फणसाड धरणाच्या मुख्य जलवाहिनीतील बिघाडामुळे होत आहे की एखाद्या घरगुती नळजोडणीमधून पाणी वाहत आहे, याची अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून गळतीचे नेमके कारण शोधणे आवश्यक आहे.

सतत वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्यावर चिखल व पाणी साचत असून, दुकानदार, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच पाण्याच्या सततच्या प्रवाहामुळे नव्याने बांधलेल्या काँक्रिट रस्त्याची झीज होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, बोर्ली परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या फणसाड धरणाची पाणीपातळी उन्हाळ्यात कमी झाल्यानंतर या परिसरात दरवर्षी पाणीटंचाईची समस्या जाणवते. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे असताना, मुख्य रस्त्यावर महिनोन्महिने पाण्याची नासाडी सुरू राहणे ही गंभीर बाब आहे.

गेल्या वर्षभरापासून या गळतीबाबत तक्रारी आणि मागण्या होत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, अद्यापही ही समस्या कायम असल्याने संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



सुयोग मित्र मंडळ चेंढरे अलिबाग सार्वजनिक नवरात्रोत्सव



घरत आळीची दुर्गाई अलिबाग, सार्वजनिक नवरात्रोत्सव



शिवराय मंडळ मारुती नाका अलिबाग सार्वजनिक नवरात्रोत्सव



श्री कृष्ण सांस्कृतीक मित्र मंडळ बायपास रोड, चेंढरे अलिबाग सार्वजनिक नवरात्रोत्सव

**पनवेल महानगरपालिका**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड
**जाहीर नोटीस सूचना**

दुरध्वनी कार्यालय : ०२२– २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२–२७४५२२३३
ई–मेलः panvelcorporation@gmail.com वेबसाईटः panvelcorporation.maharashtra.gov.in

**थेट मुलाखत (Walk in Interview)**

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजाकरीता खालील नमुद केल्याप्रमाणे शासकीय/निमशासकीय कार्यालय / सिडकोकडील, तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१० जून २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पद्धतीने खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दि. २३/१०/२०२६ रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि.२३/१०/२०२६ रोजी सकाळी १२:३० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल, तिसरा मजला येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी, प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वतः हजर राहावे. सविस्तर जाहिरात पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र | पदाचा संवर्ग | अनुभव | नेमणुक विभाग | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग १ व २ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी (पद संख्या ०१) | शासकीय / निमशासकीय / सिडको /नगर परिषद/न.पा/ म.न.पा. मध्ये सेवेत असताना किमान ०३ वर्षे आस्थापना विभागात काम केल्याचा अनुभव. | आस्थापना विभाग | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः सीबीई १५२५/ प्र.क्र.३७/ आस्थामं (का–१३) दि. १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक |
| २ | वर्ग १ व २ संवर्गातील सेवानिवृत्त लेखाधिकारी अधिकारी (पद संख्या ०१) | शासकीय / निमशासकीय / सिडको /नगर परिषद/न.पा/ म.न.पा. मध्ये सेवेत असताना किमान ०३ वर्षे आस्थापना विभागात काम केल्याचा अनुभव. | लेखापरिक्षण विभाग | |

**अटी व शर्ती आस्थापना विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध राहतील.**

**सही/–**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**

दिनांक :१३ /१०/२०२६
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.३३६/३५७/२०२६

**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड– ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय–०२१९४–२३५७३७ Email : rohanagarpalika@gmail.com

**जाहिर ई–निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणा–या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई–निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

| क्र. | कामाचा तपशिल | बयाना रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|
| १ | रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील अष्टमी आंबेडकर नगर ते रेल्वे स्थानकापर्यंत जा रस्त्यावर आवश्यक ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे व इतर आवश्यक कामे करणे | १५,५८१/– | १५००/– |
| २ | रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील हनुमान मंदिर येथे सभा मंडप बांधकाम करणे | २२,०९४/– | १५००/– |
| ३ | रोहा नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर नगर परिषद कार्यालयाची आवश्यकती स्थापत्य विषयक कामे करणे | २०,०९१/– | १५००/– |
| ४ | प्र क ०२ वरचा मोहल्ला कन्नस्तान वसुखाना आवश्यकती कामे करणे | ८४१७/– | १५००/– |

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/१०/२०२६ ते २१/१०/२०२६ या कालावधीत उपलब्ध होईल.

क्र. रोनप/बांध//ई–निविदा सुचना/१७४४/२०२६
दिनांक– १३/१०/२०२६

**सही/–**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

**सही/–**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
नगराध्यक्ष
रोहा अष्टमी नगर परिषद

# खाडीपुलामुळे बाधित मच्छीमारांना दिलासा

## सर्वेक्षणासाठी सल्लागार नियुक्तीचा प्रस्ताव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली ते ऐरोली खाडीपुलामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमार व मत्स्यव्यवसायिकांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. यासंदर्भात बाधितांचे सर्वेक्षण, अर्जांची छाननी व पात्र लाभार्थी निश्चितीसाठी सल्लागार नियुक्त करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार केला असून एक कोटी ६७ लाख ५६ हजार रुपयांच्या खर्चास वित्तीय मंजुरीसाठी हा प्रस्ताव १४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीपुढे ठेवण्यात येणार आहे.



घणसोली येथील पामबीच मार्गापासून ऐरोलीपर्यंत खाडीवर पूल उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे, मात्र पुलाच्या उभारणीमुळे तळवली गावासह दिवा कोळीवाडा, ऐरोली, घणसोली व गोठीवली परिसरातील मच्छीमार व मत्स्यव्यवसायिकांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. या बाधितांना नुकसानभरपाई देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ९ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समितीही स्थापन करण्यात आली आहे. नुकसानभरपाई निश्चित करण्यापूर्वी प्रत्यक्ष बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण, अर्जदारांच्या दाव्यांची छाननी आणि माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करावी लागणार आहे. या प्रक्रियेसाठी स्वतंत्र सल्लागार नियुक्त करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून त्यासाठी पालिकेने तीन वेळा निविदा प्रक्रिया राबविली. पहिल्या निविदा प्रक्रियेत तसेच पहिल्या फेरनिविदेत प्रत्येकी एक निविदा प्राप्त झाल्याने दुसऱ्यांदा फेरनिविदा मागविण्यात आली. या प्रक्रियेत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे तांत्रिक मूल्यमापन व आर्थिक दरांची तुलना केल्यानंतर मे. बिल्डिंग एन्व्हायरमेंट इंडिया प्रा. लि. या संस्थेने ९१.३९ इतके संयुक्त गुणांकन मिळवले. त्यामुळे या संस्थेची सल्लागार म्हणून निवड करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने पुढे आणला आहे. संबंधित संस्थेने वाटाघाटीनंतर एक कोटी ४२ लाख रुपयांचे शुल्क निश्चित केले आहे.

१८ टक्के वस्तू व सेवा करापोटी २५ लाख ५६ हजार रुपये आकारले जाणार असून एकूण खर्च एक कोटी ६७ लाख ५६ हजार रुपये होणार आहे. या खर्चाला स्थायी समितीची वित्तीय मंजुरी मिळावी, अशी प्रशासनाची मागणी आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. स्थायी समितीच्या बुधवारी होणाऱ्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास सल्लागार नियुक्ती आणि पुढील सर्वेक्षण प्रक्रियेचा मार्ग मोकळा होऊ शकतो. त्यानंतर अर्जांची छाननी, बाधितांची पात्रता निश्चिती आणि नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याची कार्यवाही पुढे जाईल, मात्र सल्लागार नियुक्तीचा प्रस्ताव अद्याप मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने नुकसानभरपाईचा प्रश्न प्रत्यक्षात कधी सुटणार हे समितीच्या निर्णयानंतर आणि पुढील कार्यवाहीवर अवलंबून राहणार आहे.

महापालिकेकडे सद्यस्थितीत ३०९ अर्ज प्राप्त झाले आहेत. भविष्यात प्राप्त होणाऱ्या अर्जांसह एकूण १२०० अर्जदारांचा विचार करण्यात आला आहे. त्यापैकी सुमारे ४०० मत्स्यव्यवसायिक नुकसानभरपाईसाठी पात्र ठरू शकतील, तर उर्वरित सुमारे ८०० अर्जदार अपात्र ठरू शकतील, असा प्राथमिक अंदाज आहे, मात्र प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि अर्जांच्या पडताळणीनंतरच पात्र व अपात्र अर्जदारांची अंतिम संख्या स्पष्ट होणार आहे.

# सीबीडीतील नागरिकांना भेट

## आमदार निधीतून ७५ लाखांची विकासकामे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या विकासाला अधिक गती देण्याच्या दृष्टीने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून हाती घेण्यात आलेल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. या विकासकामांमध्ये सीबीडी सेक्टर २ येथील 'सीबीडीचा राजा' गणेश मंदिर परिसरात सभामंडप उभारण्यासाठी ५० लाख रुपये तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी निवारा शेड उभारण्यासाठी २५ लाख रुपये अशा ७५ लाख रुपयांच्या विकासकामांचा समावेश आहे.



सीबीडी सेक्टर २ येथील गणेश मंदिर परिसरात 'सीबीडीचा राजा'साठी सभामंडप उभारण्यात येणार असून या कामासाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. या सभामंडपामुळे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन अधिक सुलभ होणार असून परिसरातील नागरिकांना मोठा लाभ मिळणार आहे. गौरव कला केंद्रासमोरील परिसरात योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड उभारण्यासाठी २५ लाखांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना नियमित योगाभ्यास, आरोग्यविषयक उपक्रम व इतर सार्वजनिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध होणार आहेत.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकारातून नवी मुंबईतील विविध भागांत पायाभूत सुविधांचा विकास, धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण, ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधा व नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासकामे मार्गी लावण्यावर त्यांचा भर आहे.

भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी भाजप नेते निलेश म्हात्रे, विचारे, अजय सिंग, अनिल कुदळे, गोपाळराव गायकवाड, प्रभाकर कांबळे, आरती राऊळ, सुरेखा बामणकर, ज्योती पाटील, मनीष बिजलानी, कमल शर्मा, संजय ओबेरॉय, मनी कोणार, राजू कोळी, साई एकता मित्र मंडळाचे पदाधिकारी, भारतीय योग केंद्रातील महिला व पुरुष सदस्य, कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच स्थानिक उपस्थित होते.

या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांत समाधानाचे वातावरण असून सोयीसुविधांमध्ये भर घालणारी आणखी अनेक प्रस्तावित विकासकामे येत्या काळात हाती घेण्यात येणार आहेत. बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार मंदा म्हात्रे यांचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत.

# गव्हाण विद्यालयात सखी सावित्री समितीची पाचवी सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे सोमवारी (दि. १२) सखी सावित्री समितीची पाचवी सभा उत्साहात संपन्न झाली. सभेत सायबर सुरक्षा, इंटरनेटचा सुरक्षित वापर, पालक-मुलींमधील मनमोकळा संवाद, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा परिचय या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

सखी सावित्री समितीच्या विभागप्रमुख हर्षला पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेतील प्रमुख विषय मांडले. पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी या विषयांच्या अनुषंगाने उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची काळजी, सायबर सुरक्षेचे महत्त्व, मुलींनी स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहण्याची आवश्यकता व पालकांनी मुलींशी विश्वासपूर्ण व मोकळा संवाद साधण्याचे महत्त्व यावर त्यांनी प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित माता-पालक भगिनी माधुरी उदय पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले. मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यात समन्वय असणे आवश्यक असून मुलींना आपल्या अडचणी व भावना मोकळेपणाने व्यक्त करता येतील असे वातावरण निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली. सभेला सर्व शिक्षिका उपस्थित होत्या. आभार प्रतिज्ञा घरत यांनी मानले. यावेळी करुणा तांडेल, अर्चना पाटील, गीतांजली म्हात्रे, रंजीता पाटील, दर्शना माळी, चारुशीला ठाकूर, दर्शना म्हात्रे, सारिका ठाकूर, संपदा म्हात्रे, वृषाली म्हात्रे, विद्या पाटील, शीतल ठाकूर, सुजाता शेलार, आफरीन शेख, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी आदी शिक्षिका उपस्थित होत्या. मुलींची सुरक्षितता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देत सामाजिक व डिजिटल माध्यमांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.



# रिक्षाचालकांकडून मनमानी भाडे आकारणी

## रोजच्या वादामुळे नागरिकांना होतोय मनस्ताप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरातील रिक्षा प्रवास नागरिकांसाठी दिवसेंदिवस त्रासदायक होत चालला आहे. अनेक रिक्षाचालक नियमानुसार मीटर न लावता मनमानी भाडे आकारत असल्याने प्रवाशांचा संताप वाढला आहे. विशेषतः सानपाडा, नेरूळ, सीबीडी-बेलापूर, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली परिसरात हा प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहे. रोजच्या प्रवासात होणाऱ्या वादांमुळे कामावर जाणाऱ्या नागरिकांना वेळेचा अपव्यय व मानसिक ताण सहन करावा लागत आहे.



शहरातील अनेक रिक्षाचालकांकडून मीटर चालू नाही, वाहतूक कोंडी किंवा रस्त्याचे काम सुरू आहे म्हणून जास्त भाडे लागेल, 'त्या मार्गाला रिक्षा मिळत नाही' अशी कारणे देत जादा भाडे मागण्याचे प्रकार वाढत आहेत. कार्यालयीन वेळेत तर ही मागणी अधिकच वाढते. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. परिवहन विभाग आणि वाहतूक विभागाकडून तपासणी मोहिमा राबवल्या जातात. मात्र त्या नियमित नसल्याने चालकांवर निर्बंध राहत नाहीत. मीटर सीलबंद करणे, दंडाची पावती देणे, परवान्यांची पडताळणी करणे यासारख्या कारवाया झाल्या तरी त्याचा फारसा परिणाम दिसत नाही.

दरम्यान, नवीन परवाने वाटपानंतर अनेक भागात रिक्षाचालकांची संख्या कमालीची वाढली आहे. यापैकी अनेक रिक्षाचालक गणवेशात नसून अनेकांकडे अधिकृत बॅच किंवा परवाना नसतानाही सर्रास रिक्षा चालवली जात असल्याचे आढळून आले आहे. त्यात अनेकदा अल्पवयीन मुलेही रिक्षा चालवत असल्याचे आढळले आहे. असे रिक्षाचालक टोळक्याने रेल्वे स्थानक, नागरी वस्तीबाहेर उभे राहून मनमानी भाडे आकारत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तर अनेकदा नजीकची भाडी नाकारण्याचे प्रकारही घडत असल्याने रिक्षाचालक व नागरिक यांच्यात वादाचे प्रसंग घडत आहेत.

यामुळे प्रामाणिकपणे रिक्षा चालवणारेही भरडले जात आहेत. या सर्व प्रकारांमुळे नागरिक त्रस्त असून अशा मुजोर रिक्षाचालकांना आळा घालण्यासाठी नियमित तपासणी, दंडाची कडक अंमलबजावणी, सर्व रिक्षांत डिजिटल मीटर बसवणे, नागरिकांसाठी तत्काळ तक्रार नोंदणी सुविधा उपलब्ध करणे अशा मागण्या नागरिकांनी केल्या आहेत, तर काही प्रवाशांनी सीसीटीव्ही, जीपीएस प्रणाली व भाडेपावती देणे बंधनकारक करण्याची सूचनाही केली आहे. नवी मुंबईत सार्वजनिक वाहतूक पर्याय मर्यादित असल्याने मोठ्या संख्येने नागरिक रिक्षांवर अवलंबून आहेत. त्यामुळे मनमानी भाडेवाढीवर नियंत्रण न आल्यास नागरिकांचा त्रास वाढतच जाणार आहे. प्रशासनाने कठोर पावले उचलून ही समस्या सोडवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

> **मनमानी भाडे आकारणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात नजीकच्या पोलीस ठाण्यात तत्काळ तक्रार नोंदवावी. अशा रिक्षाचालकांवर निश्चितच कडक कारवाई करण्यात येईल.**
> **- दत्तात्रेय सागोळकर,**
> उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई

## दुर्गामाता दौड : (माळ तिसरी)










पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत सुकापूरपासून ग्रामपंचायत, गावदेवी मंदिर, विठोबा मंदिर, गणपती मंदिर, जरीमरी माता मंदिर तसेच नानोशी गाव अशी दुर्गामाता दौड काढण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# खारघरमध्ये खाडीकिनारी अनोळखी पुरुषाचा मृतदेह

**पनवेल** : खारघर सेक्टर ८ मधील कानशेठची वाडी परिसरातील खाडीकिनारी एका अनोळखी पुरुषाचा फुगलेल्या व कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटली नसून खारघर पोलिसांकडून नातेवाइकांचा शोध सुरू आहे. खारघर रेल्वे पुलाखालील खाडीकिनारी मृतदेह आढळला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून प्राथमिक माहितीनुसार पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

मृत व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# टॉवरवर चढलेल्या इसमाच्या प्रकरणाला नवे वळण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरात टॉवरवर चढलेल्या सुबोध करण सिंग (३३, रा. माणिकपूर, ता. चांदण, जि. बांका, बिहार) या इसमाला पोलिसांनी यशस्वीरीत्या सुखरूप खाली उतरविल्यानंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. प्राथमिक माहितीनुसार सुबोध सिंग यांनी मोबाइल हॅक झाल्याचा आणि आपल्या बँक खात्यातून सुमारे तीन लाख रुपये काढून घेतल्याचा संशय व्यक्त केला होता.

संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पैसे परत मिळावेत या मागणीसाठी ते टॉवरवर चढले होते, मात्र रसायनी पोलिसांनी अधिक तपास केला असता सुबोध सिंग यांचा मोबाइल हॅक झाल्याचे आढळून आले नाही. तसेच त्यांच्या बँक खात्यातून पैसे गेल्याचा प्रकारही तपासात निष्पन्न झाला नसल्याची माहिती समोर आली आहे. सुबोध सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार पैसे काढून घेतल्याचा प्रकार तपासात आढळून न आल्याने त्यांनी टॉवरवर चढण्यामागे अन्य काही कारण होते का, या दिशेने पोलिसांकडून चौकशी केली जात असल्याचे समजते. दरम्यान, या घटनेमागील नेमके कारण आणि संबंधित बाबींचा उलगडा पुढील पोलीस तपासानंतरच होणार आहे.



गव्हाण-कोपर हायस्कूल, शिक्षिका वृंद



नवरात्र उत्सव देवी दर्शन महिला मंडळ, खालापूर



एपेक्स हॉस्पिटल, मुलुंड

# रायगड जिल्ह्यातील बँकांनी कृषी कर्जवाटप आणि आर्थिक समावेशन मोहिमेला गती द्यावी -किशन जावळे



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा, विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा तसेच कृषी कर्जवाटपाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची (DLCC) आणि जिल्हास्तरीय आढावा समितीची (DLRC) बैठक जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. कृषी कर्जवाटप आणि आर्थिक समावेशन मोहिमेला गती देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस बँक ऑफ इंडियाचे उपविभागीय व्यवस्थापक भरत सहाय, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रदीप आपसुंडे, जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त गुरूशांत हरळया, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रियदर्शिनी मोरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त जलील अहमद, RSETI चे संचालक सुमित धनोरकर तसेच अग्रणी जिल्हा व्यवस्थापक सुधीर गायकवाड यांच्यासह विविध बँकांचे जिल्हा समन्वयक, शासकीय विभागांचे अधिकारी आणि बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील बँकांच्या कामगिरीचा विविध महत्त्वपूर्ण निकषांवर सविस्तर आढावा घेतला. यामध्ये पीक कर्जवाटप, वार्षिक पत आराखड्याची उद्दिष्टपूर्ती, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्जवाटप तसेच विविध शासकीय योजनांमधील प्रलंबित प्रकरणांचा समावेश होता.

कृषी कर्जवाटपाला गती देण्याचे निर्देश

शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे, यासाठी बँकांनी किसान क्रेडिट कार्ड आणि इतर कृषी कर्जांचे वितरण जलदगतीने पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. तसेच कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत लागू असलेल्या मदत व सवलतींचा लाभ पोहोचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**२१ ऑक्टोबरपासून आर्थिक समावेशन मोहीम**

केंद्र शासनाच्या आर्थिक समावेशन योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रायगड जिल्ह्यात दि.२१ ऑक्टोबर ते दि.३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत विशेष आर्थिक समावेशन (FI Saturation) मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व बँकांनी ग्रामपंचायती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून शिबिरांचे नियोजन करावे, नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी आणि आवश्यक निधीची तरतूद वेळेत करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व निश्चित केंद्रांवर शिबिरे आयोजित करून शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यावर त्यांनी भर दिला.

या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या केंद्रांचे संबंधित बँकांना वाटप बैठकीत अंतिम करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक केंद्रावर नियोजनबद्ध पद्धतीने शिबिरे आयोजित करणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत विविध आर्थिक समावेशन योजनांचा लाभ पोहोचविणे सुलभ होणार आहे.

जिल्ह्यातील कृषी कर्जवाटप, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि आर्थिक समावेशन मोहिमेची यशस्वी पूर्तता यासाठी सर्व बँका आणि शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले.

## नागोठण्याचे ग्रामदैवत जोगेश्वरी माता मंदिरात नवरात्रोत्सव

**नागोठणे : बातमीदार**





नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व वाघ्रेश्वर महाराज यांची विधिवत घटस्थापना करण्यात आली असून, सालाबादप्रमाणे यावर्षीही रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते बुधवार, दि. १९ ऑक्टोबरदरम्यान नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त संपूर्ण मंदिर परिसर, प्रांगण तसेच तीन तळी परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी विद्युत रोषणाईने श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसर उजळून निघत असून, या आकर्षक सजावटीमुळे मंदिर परिसराला भक्तिमय आणि प्रसन्न वातावरण प्राप्त झाले आहे.

नवरात्रोत्सवाच्या काळात नागोठणे तसेच परिसरातील असंख्य भाविक श्री जोगेश्वरी मातेच्या दर्शनासाठी मंदिरात येत आहेत. सुवासिनींकडून मातेची साडी–चोळी अर्पण करून पारंपरिक पद्धतीने ओटी भरून दर्शन घेतले जात आहे. नागोठणे शहरातील विविध आळीतील ग्रामस्थांना नवरात्रोत्सवात मातेचा मान देण्याची परंपरा असून, रात्रीच्या जागरणासाठी आळीनुसार पाळ्या नेमण्यात आल्या आहेत. संबंधित ग्रामस्थ भक्तिभावाने आपली पाळी बजावत आहेत. नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांचा मान खडक आळीतील ग्रामस्थांना मिळाला आहे.

नवरात्रोत्सवाच्या नऊही दिवसांत रात्री ८ ते ९ या वेळेत मंदिर परिसरात गरबा नृत्याचे आयोजन करण्यात येत आहे. या गरबा नृत्यात तरुण–तरुणी उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून, मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहून गरब्याचा आनंद घेत आहेत.

त्यानंतर रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होत असून, रात्री १२ वाजता हरिजागराने दिवसाच्या धार्मिक कार्यक्रमाची सांगता होत आहे. विविध भक्तिमय कार्यक्रमांमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे यांनी श्री जोगेश्वरी माता मंदिरात येऊन मातेचे दर्शन घेतले. यावेळी खडक आळी ग्रामस्थांचा मान होता. या प्रसंगी सपोनि रविंद्र पारखे, पो. हा. महेश लांगी व स्वप्नील भालेराव यांचा श्री जोगेश्वरी माता मंदिर उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच खडक आळीतील ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता नवरात्रोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री जोगेश्वरी माता मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन व सचिव भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सचिव विवेक देशपांडे, खजिनदार सतीश पाटील, सहसचिव अनिल पवार यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## आळी आंबिवली येथे अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन; आरोपीला अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**




रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आळीअंबिवली येथे एका अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ८.३५ वाजण्याच्या सुमारास मौजे आळीअंबिवली मोहोपाडा येथील स्वामी समर्थ मठाजवळ ही घटना घडली. संबंधित अल्पवयीन मुलगी आपल्या घरी काम करीत असताना नवीन पोसरी, ता. खालापूर येथील आरोपी तिच्या घरी आला. यावेळी त्याने मुलीला मारहाण करून तिच्याशी गैरवर्तन केल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७६/२०२६ अन्वये बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाचकर करीत आहेत.

## म्हसळा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा; भाजप तालुकाध्यक्ष निलेश मांदाडकर यांची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाअभावी शेतकरी पशुधन व पाणीटंचाई संकटावर उपाययोजना करावी सध्या खरीप हंगामा हंगामातील सर्व भात शेती नाचणी वरी, पावसा अभावी , हिरवा चारा उपलब्ध उपलब्धता घटल्यामुळे पशुधनावर देखील विपरीत परिणाम होणार असल्यामुळे शेतकरी चिंतित असल्याने महाराष्ट्र सरकारने सरसकट दुष्काळ जाहीर करण्यात यावे. असे सांगत म्हसळा तालुकाही दुष्काळग्रस्त जाहीर करावा अशी मागणी भाजपचे म्हसळा तालुकाध्यक्ष निलेश मांदाडकर यांनी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात निलेश मांदाडकर पुढे म्हणाले की, यंदाच्या कमी पावसामुळे पाणीटंचाईला देखील सामोरे जावे लागेल यावर उपाययोजना म्हणून वनराई बंधारे बांधण्याचे काम स्थानिक रोजगार निर्मिती करून पूर्ण करण्यात यावी असे देखील नमूद केले आहे.

म्हसळा तालुक्यातील खरसई ,मेंदडी ,वारळ, काळसुरी निगडी, कांदळवाडा ,पाबरे ,खारगाव खुर्द, बुद्रुक तोंडसुरे, खामगाव ,आदी गावांमध्ये ८०% पेक्षा जास्त भात शेतीचे नुकसान झाले आहे. ज्या शेतकऱ्याने कर्ज काढून बियाणे खते घेतली होती त्यावर दुबार पेरणी संकट कोसळले होते

त्यामुळे तात्काळ पंचनामे करावेत संपूर्ण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून एकरी पन्नास हजार नुकसान भरपाई द्यावी. तसेच पीक विमा कंपनीने तात्काळ सर्वे करून शेतकऱ्यांना विम्याची रक्कम द्यावी शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज १००% माफ करावे आम्ही पूर्ण वर्ष खरीप हंगामाच्या पिकांवर अवलंबून असतो. आता पिकच करपल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा हा प्रश्न असल्याने शासनाने तात्काळ पंचनामे करून मदत जाहीर करावी अशी मागणी त्यांनी केली आहे .

## ढोकशेत धरणात बुडालेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील ढोकशेत येथील धरणात पोहण्यासाठी गेलेले मौजे दहिगाव येथील रहिवासी दत्तू गौरु वाघमारे (वय ४४) हे रविवारी (ता. ११) सकाळी ११:०० वाजेच्या सुमारास पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात बुडाले होते. अथक शोधमोहिमेनंतर अखेर सोमवारी (ता. १२) सकाळी त्यांचा मृतदेह शोधण्यात यश आले आहे.

दत्तू वाघमारे अचानक खोल पाण्यात गेले. एका लहान मुलाने त्यांना पाण्यात बुडताना पाहिले आणि तात्काळ स्थानिकांना माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पाली पोलीस ठाण्याचे पथक, सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे जिवरक्षक आणि पालीतील 'आपदा मित्र' तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी युद्धपातळीवर व्यापक शोधमोहीम सुरू केली.

धरणातील पाण्याची खोली अंदाजे १२० ते १३० फूट असल्याने रेस्क्यू टीमच्या जिवरक्षकांसाठी शोधकार्य अत्यंत आव्हानात्मक आणि जोखमीचे ठरत होते. प्रचंड खोली आणि नेमक्या जागेचा अंदाज न आल्याने रविवारी दिवसभरात यश आले नव्हते. मात्र, प्रशासकीय यंत्रणा आणि जिवरक्षकांनी हार न मानता सोमवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम तीव्र केली असता अखेर वाघमारे यांचा मृतदेह हस्तगत करण्यात आला.

रायगड जिल्ह्यात नदी, तलाव आणि धरणांमध्ये बुडण्याच्या दुर्घटना वारंवार घडत असतात. अशा आपत्कालीन परिस्थितीत शोधमोहीम जलद, प्रभावी व जिवरक्षकांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन राबवण्यासाठी आधुनिक अंडरवॉटर ड्रोन उपकरणाची नितांत गरज आहे. सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेने गेल्या पाच महिन्यांपासून रायगड जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर फाटक यांच्याकडे हे उपकरण उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

प्रशासनाकडून आश्वासने मिळाली असली तरी प्रत्यक्षात अजून ड्रोन मिळालेला नाही. या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने त्वरित 'अंडरवॉटर ड्रोन' उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी रेस्क्यू टीम व नागरिकांकडून केली जात आहे.



## जांभूळपाडा ग्रामपंचायत कार्यालयाला सहाय्यक कृषी अधिकारी मिळाले!



**पाली : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड जांभूळपाडा कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना नियमित बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी योजना, अनुदान आणि अर्ज प्रक्रियेबाबत एकाच ठिकाणी सहजरित्या मार्गदर्शन मिळणार असून कृषी योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.

'सुधागड वैभव फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनी'चे संचालक दत्तात्रय दळवी यांनी ३० सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामपंचायतीला पत्र देऊन सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात ठराविक दिवशी व वेळेत बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती.

शासनाच्या विविध कृषी योजना, अनुदान आणि मार्गदर्शनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी वेळेनुसार गावात येतात; मात्र योग्य बैठकीची जागा नसल्यामुळे सर्व शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचणे त्यांना कठीण जात होते. परिणामी अनेक शेतकरी शासकीय योजनांच्या माहितीपासून व लाभांपासून वंचित राहत होते.

सुधागड वैभव फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनीच्या अर्जाची दखल घेत, वऱ्हाड जांभूळपाडा ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ३० सप्टेंबर २०२६ या विषयावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना नियमित बसण्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## माथेरानकरांचा प्रामाणिकपणा; सापडलेला मोबाईल पर्यटक महिलेला केला परत

**माथेरान : बातमीदार**



माथेरान येथे फिरण्यासाठी आलेल्या पर्यटक महिलेचा हरवलेला महागडा मोबाईल स्थानिकांच्या मदतीने परत मिळाल्याने पर्यटक महिलेने समाधान व्यक्त करीत माथेरानकरांचे आभार मानले.या घटनेतुन स्थानिक नागरिकांचा प्रामाणिकपणा अधोरेखित झाला असून,पर्यटक महिलेने त्यांचे कौतुक केले.

रात्रीचे जेवण झाल्यानंतर सुमारे दहाच्या सुमारास पर्यटक रुचिता या बाजार पेठेतील श्रीराम चौकात असलेल्या एका कठड्यावर आपल्या मैत्रिणीसोबत बसल्या होत्या.यावेळी त्यांनी मोबाईल बाजूला ठेवला होता.तेथून निघाल्यानंतर मोबाईल हरवल्याचे त्यांच्या लक्षात आले.सामाजिक कार्यकर्ते अमोल चौगुले यांनी मोबाईलचा शोध घेत त्यांना मदत केली मात्र मोबाईल काही सापडला नाही.त्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली.

परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासले असता एका वयोवृद्ध महिलेने मोबाईल उचलल्याचे दिसून आले.त्या महिला विमल शहा असल्याचे समोर आले.मोबाईल बाबत फारशी माहिती नसल्याने त्यांनी तो शेजारी राहणारे तुषार सकपाळ यांच्याकडे दिला.अमोल चौगुले यांनी समन्वय साधून अखेर मोबाईल रुचिता श्रीराम यांच्याकडे सुपूर्द केला.हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने त्यांना आनंदाश्रू अनावर झाले.या प्रसंगामुळे माथेरानमधील स्थानिक नागरिकांच्या प्रामाणिकपणाचे पुन्हा एकदा दर्शन घडले असून पर्यटकांच्या सुरक्षतेच्या विश्वासात आणखीन भर पडली आहे.

# हैदराबादची विजयी सलामी

## रणजी ट्रॉफी स्पर्धेत त्रिपुरावर मात; तनयच्या नऊ विकेट्स

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारतीय देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमधील मानाची एक स्पर्धा म्हणजे रणजी ट्रॉफी. या स्पर्धेचा २०२६-२७ हंगाम सुरू झाला असून या हंगामातील पहिला विजय मोहम्मद सिराजच्या नेतृत्वाखालील हैदराबादने नोंदवला आहे. हैदराबादने त्रिपुराला एक डाव आणि ४० धावांनी पराभूत केले. या सामन्यात तनय त्यागराजनने तब्बल नऊ विकेट्स घेतल्या.



हैदराबादच्या जिमखाना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात त्रिपुराने नाणेफेक जिंकली होती. त्यांचा कर्णधार मणीशंकर मुरासिंग याने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्रिपुराने पहिल्या डावात बिक्रमकुमार दासच्या अर्धशतकी आणि ऋतुराज रॉयच्या ३३ धावांच्या जोरावर १३४ धावसंख्या उभारली होती. यावरून हैदराबादची गोलंदाजी किती प्रभावी होती हे कळते. या डावात सिराजने एकही विकेट घेतली नाही, मात्र त्याने कमी धावा खर्च केल्या. त्याने नऊ षटकांत २५ धावा दिल्या. यामध्ये त्याने दोन षटके निर्धाव टाकली तसेच हैदराबादकडून अनिकेत रेड्डीने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. तनयने तीन आणि रुतिक यादवने एक विकेट घेतली.

हैदराबादच्या पहिल्या डावात सलामीवीर तनय अग्रवालने ५४ धावा आणि अभिरथ रेड्डीने ३२ धावा करून संघाला चांगली सुरुवात दिली. मधली फळी अधिक काळ टिकली नाही. रुतिक यादवने ६१ धावा, राहुल रादेश आणि चमा मिलिंद यांनी प्रत्येकी ४०-४० धावा केल्या. त्यामुळे हैदराबादने पहिल्या डावात सर्व विकेट्स गमावत २९४ धावासंख्या केली. हैदराबादने पहिल्या डावात १६० धावांची आघाडी घेतली. त्रिपुराकडून संदीप सरकारने आठ विकेट्स घेतल्या.

त्रिपुराचा दुसरा डावही अवघ्या १२० धावसंख्येवर संपष्टात आला. त्यांचे सहा खेळाडू दुहेरी धावसंख्येचा आकडाही गाठू शकले नाही. यामध्ये हैदराबादकडून तनयने प्रभावी कामगिरी केली. त्याने दुसऱ्या डावात सहा विकेट्स घेत या सामन्यात एकूण ९ विकेट्स घेतल्या. या विजयामुळे हैदराबाद संघ सहा गुणांसह 'गट ब'मध्ये अव्वल स्थानावर पोहचला आहे.

## राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे पारितोषिक वितरण; विजेत्या खेळाडूंचा गौरव



**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवा सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या माध्यमातून तसेच रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, विक्रम साबळे फाउंडेशन आणि कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेमुळे राज्यातील उदयोन्मुख कुस्तीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची हक्काची संधी मिळाली असून खेळाडूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

या स्पर्धेच्या यशस्वी समाप्तीनंतर आयोजित करण्यात आलेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यास रायगड जिल्हा कुस्ती संघाचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरवण्यात आले तसेच त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, पनवेल पंचायत समितीचे सदस्य राजेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, राजेश भोईर, निलेश पाटील, मयुर कदम यांच्यासह विविध मान्यवर, क्रीडाप्रेमी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने खेळाडू उपस्थित होते.

## शुबमन, शफाली आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून दिल्या जाणाऱ्या आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी शुबमन गिल आणि शफाली वर्मा या दोन्ही भारतीय खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यांनी सप्टेंबर महिन्याचा आयसीसी पुरस्कार जिंकला आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेत गिलने जबरदस्त कामगिरी केली. यासह पुरुषांमध्ये पाचव्यांदा आयसीसीच्या पुरस्कारावर त्याने नाव कोरले आहे; तर आशिया चषक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत केलेल्या कामगिरीबद्दल शफालीला महिलांसाठीच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शफालीने दुसऱ्यांदा हा पुरस्कार पटकावला आहे.

## जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत प्रिआ स्कूलची चमक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत प्रिआ स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सहा सुवर्ण, तीन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण १३ पदके पटकावली आहेत.

या यशस्वी खेळाडूंना शाळेचे क्रीडाशिक्षक व्यंकटेश थेवर यांचे मार्गदर्शन लाभले. या उज्वल यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका, प्रिआ कमिटीचे सर्व सदस्य, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व मार्गदर्शक यांचे अभिनंदन केले. भविष्यातही विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात अशीच यशस्वी कामगिरी करून शाळेचा गौरव वाढवावा, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.




## जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलचे वर्चस्व

### तीन संघांना विजेतेपद; मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील एचओसीएल मैदानावर पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करत वर्चस्व प्रस्थापित केले. या स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघासह १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या संघांनी सांघिक विजेतेपद पटकावत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधोरेखित केली.

या स्पर्धेत तिन्ही संघांनी उत्कृष्ट सांघिक खेळ, समन्वय, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉल प्रशिक्षक तथा क्रीडा शिक्षक मनोज सिग्गू यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिन्ही विजयी संघांची पालघर येथे होणाऱ्या मुंबई विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्य डॉ. रीमा निकळजे, मॅनेजमेंट रिप्रेझेंटेटिव्ह आर.बी. पाटील आणि स्पोर्ट्स डायरेक्टर पद्माक्षण यांनी सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.





झंकार नवरात्रोत्सव













**पनवेल :** येथील मिडलक्लास हौसिंग सोसायटी मैदानामध्ये सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, संजय जैन, उल्हास झुंजारराव, आदि भगत, पल्लवी झुंजारराव, अमोघ ठाकूर, कोमल कोळी आदींची उपस्थिती लाभली. यावेळी विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com